दैनिक बीड

# पुण्यभूमी

संपादकः बाळासाहेब मस्के

बी.एम. प्रतिष्ठान
बी. एम. प्रतिष्ठान
महाराष्ट्र राज्य
संस्थापक अध्यक्ष
बाळासाहेब भगवानराव मस्के

बीड | बुधवार,दि.३०ऑक्टोबर २०२४ | वर्षे४रे | अंक८७वा | पाने ६ | दररोजच्या घडामोडीसाठी वाचत रहा... पुण्यभूमी | https://Paper.epunyabhumi.in | RNI No : MAHAMAR/2021/81902 | ₹ ३




नागरिकांनो वाट लावून घ्यायची नसेल तर...

# अरेबियन ज्वेलर्सपासून सावधान?

अरेबियन ज्वेलर्सच्या विरोधात सचिन उबाळेंची तक्रार

मनी सर्क्युलेशन, मनी लॉन्ड्रिंगचे केले गंभीर आरोप

महेबूब रहमान मलिकची चौकशी करावी:निवेदन


पोलीस अधीक्षकसह संबंधित विभागास दिल्या तक्रारी

## लोकांना आमिष दाखवून गंडा घालण्याचा डाव!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

बीडमध्ये हजारो कोटींना चुना लावून अनेक मल्टीस्टेटचे संचालक, जेलची हवा खात बसलेले आहेत. त्यामुळे लाखो लोकांचे आर्थिक दिवाळे निघाले असून मल्टीस्टेट संचालकांनी जास्त व्याजदराचे आमिष दाखवून त्यांची फसवणूक केलेली आहे. असे असतांना आता बीडमध्ये अरेबियन ज्वेलर्सने धुमाकूळ घातला आहे. परिणामी बीडच्या जनतेची पून्हा फसवणूक होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नागरिकांनो अरेबियन ज्वेलर्सच्या नादी लागून वाट लावून घेवू नका. असे आवाहन स्वाभिमानी संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष तथा ठेवीदार संघर्ष समितीचे मुख्य प्रवर्तक प्रा.सचिन उबाळे यांनी केले आहे. एवढेच नव्हे तर अरेबियन ज्वेलर्सच्या विरोधात पोलीस अधीक्षक यांच्याकडे तक्रारही केली आहे. त्यामध्ये अरेबियन ज्वेलर्सविरोधात मनी सर्क्युलेशन, मनी लॉन्ड्रिंगचे गंभीर आरोप केले असून महेबूब रहमान मलिकची चौकशी करावी अशी मागणी केली आहे. त्यामुळे अरेबियन ज्वेलर्स खरोखरच फ्रॉड आहे का? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

पोलीस अधीक्षक यांना दिलेले निवेदन


स्वाभिमान
आपला,
प्रा.सचिन किशोर उबाळे
धन्यवाद...!






### महेबूब रहेमान मलिक...

अरेबियन ज्वेलर्सचे प्रमुख महेबूब रहेमान मलिक, मूळ कुठले रहिवासी आहेत. हा शोध पोलीस प्रशासनाने घेवून जनतेला सांगावे. तसेच अरेबियन ज्वेलर्सच्या माध्यमातून १ ग्राम सोने खरेदी करा आणि आकर्षक बक्षिसे जिंका, तेही कोटी रुपयांच्या जवळपास एवढा पैसा नेमका कुठून आला आहे. असा प्रश्न प्रा.सचिन उबाळे यांनी निवेदनातून उपस्थित केला आहे.

### आशीर्वाद लॉन्समध्ये ...

अरेबियन ज्वेलर्सकडून १ ग्राम सोने खरेदी करा आणि जिंका आकर्षक बक्षिसे अशी जाहिरातबाजी करण्यात आली होती. त्यानुसार बीड शहरातील आशिर्वाद लॉन्समध्ये लक्की ड्रॉ झाला. त्यामध्ये दोन चारचाकी वाहनांची सोडत करुन अरेबियन ज्वेलर्सने लोकांना आमिष देवून गुंतवणूक करण्यास भाग पाडले आहे. मात्र बीडच्या जनतेने चुकूनही अरेबियन ज्वेलर्स येथे सोने खरेदी करु नये.कारण त्या सोन्याची काय गॅरंटी सोने खरे आहे की खोटे. असा सवाल प्रा.सचिन उबाळे यांनी उपस्थित केला आहे.

### परवानग्या घेतल्या होत्या का?


अरेबियन ज्वेलर्सने बीडमध्ये मोठ्या प्रमाणात गाजावाजा करुन जाहिरातबाजी केली.परंतू संबंधित विभागाची रितसर परवानगी घेतली होती का? यासह अनेक मुद्दे सचिन उबाळे यांनी उपस्थित केले आहेत. त्यामुळे काय खर आणि काय खोटं याचा बुरखा येत्या काळात टराटर फाडला जाणार आहे.

---

भारतीय सैनिकांना पूर्वीप्रमाणे

## गस्त घालता येणार

सीमावाद : देप्सांग, देम्चोक भागातून सैन्य मागे प्रक्रिया पूर्ण



दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

भारत आणि चीन यांच्यात २०२० पासून सुरु असलेला सीमावाद आता संपुष्टात येणार आहे. दोन्ही देशांनी वादग्रस्त भागातून सैन्य माघारी घेण्याचे तसेच या भागातील अस्थायी चौक्या हटवण्याचे मान्य केलं आहे. त्यानुसार सैन्य मान्य मागे घेण्याची तसेच चौकी हटवण्याची प्रक्रिया आज पूर्ण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे देप्सांग पठार आणि देम्चोक या दोन ठिकाणी आता भारतीय सैनिकांना मे २०२० पूर्वीप्रमाणे गस्त घालता येणार आहे.यासंदर्भात

पान २ वर...

## शरद पवारांचे 'ते' वक्तव्य म्हणजे फक्त थापा

राजकीय: अजित पवार नेमकं काय म्हणाले

मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी सांगलीच्या इस्लामपूर येथील सभेत प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना राज्याचा मुख्यमंत्री करण्याबाबतचे संकेत दिले. त्यांच्या या संकेतांवर आज उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी प्रतिक्रिया दिली आहे. इस्लामपूर येथे सभा झाली आणि वरिष्ठांनी सांगितले इथे मुख्यमंत्री पद येणार. या साफ थापा आहेत. ज्या गावच्या भाबळी त्या गावच्या बोरी. २००४ साली राष्ट्रवादीचे सर्वाधिक आमदार असताना देखील चार खाती जादा घेऊन काँग्रेसचा मुख्यमंत्री केला. जेव्हा



जास्त जागा घेऊन मुख्यमंत्री पद घेईना, मग आता कसे रे घेणार? कारे लबाड घराचे आवताना जेवल्याशिवाय खरं नाही, त्यामुळे ते सगळे खोटं आहे, असं अजित पवार म्हणाले. निसर्गाचा एक नियम आहे. तुम्ही एखाद्या गोष्टीला दाबण्याचा प्रयत्न कराल ती गोष्ट तेवढ्यात ताकतीने उसळून येते. कोणाचं लुबाडून घ्यायचं नसतं. आम्ही कुणाची कारखाने घेतली नाही ,कुणाचे उभे घेतले किंवा त्यात भर घातली, असं अजित पवार म्हणाले.अजित पवार यांनी यावेळी जयंत पाटील यांच्याकडून लाडकी बहीण

पान २ वर...

## ट्रम्प यांच्या रॅलीतून वांशिक टिप्पणी

देशविदेश:अध्यक्षपद निवडणूक अखेरच्या टप्प्यात

वृत्तसंस्था/न्यूयॉर्क

अमेरिकेत अध्यक्षपदाची निवडणूक ऐन रंगात आली असताना, रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार तथा अमेरिकेचे माजी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या प्रचारार्थ न्यूयॉर्कच्या 'मॅडिसन स्क्वेअर गार्डन'मध्ये आयोजित कार्यक्रमात अश्लीलता आणि वर्णद्वेषाबद्दल टिप्पणी केल्याचे समोर आले आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ट्रम्प निवडणूक प्रचारातील अखेरचा संदेश देणार होते. परंतु प्रचार कार्यक्रमातील वादग्रस्त टिप्पणींमुळे त्यांच्यावर सर्वच स्तरातून टीका होत आहे.

अमेरिकेत ५ नोव्हेंबर २०२४ रोजी अध्यक्षपदासाठी निवडणूक होत आहे. या निवडणुकीच्या एक आठवडा आधी, रविवारी रात्री ट्रम्प यांच्या रॅलीतील

पान २ वर...

## तलवाड्यात पोलिसांचा रुटमार्च

प्रशासनः निवडणुकीमुळे पोलीस अलर्ट



तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा व आदी गावात दिं.३०/१०/२०२४ रोजी पाच वाजता सीमा सुरक्षादलाच्या जवानांसह तलवाडा पोलिसांनी रूट मार्च केला दरम्यान तलवाडा गावात निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांनी खबरदारी घेतली आहे. त्यासाठी तलवाडा पोलीस अलर्ट झाले आहे. पोलिस स्टेशन पासून शराफा गल्ली, नवीन बसस्थानक, बाजार रोड, छत्रपती शिवाजी महाराज चौक,ते

पान २ वर...

---

विक्रीत घट | चीनला १.२५ लाख कोटी रुपयांचा फटका बसण्याची शक्यता

# यंदा 'व्होकल फॉर लोकल'चा प्रभाव

दिल्ली/पुण्यभूमी प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या 'व्होकल फॉर लोकल' उपक्रमामुळे देशभरात चीनी वस्तूंच्या विक्रीत घट झाली आहे. त्यामुळे चीनच्या व्यापाऱ्यांना जवळपास १.२५ लाख कोटी रुपयांचा फटका बसण्याची शक्यता आहे, अशी माहिती ऑल इंडिया कॉन्फेडरेशन ऑफ इंडियाकडून देण्यात आली आहे. तसेच केवळ धनत्रयोदशीच्या दिवशी किरकोळ व्यापारात ६० हजार कोटी रुपयांची उलाढाल झाल्याची शक्यता आहे, असेही त्यांनी सांगितलं. त्यामुळे देशभरात विविध चर्चांना उधाण आलं आहे.यासंदर्भात बोलताना ऑल इंडिया कॉन्फेडरेशन ऑफ इंडियाचे सरचिटणीस तथा दिल्लीच्या चांदणी चौकचे खासदार प्रवीण खंडेलवाल म्हणाले, यंदा दिवाळीची सुरुवात सकारात्मक झाली आहे. देशभरातील बाजारपेठांमध्ये 'वोकल



फॉर लोकल'चा प्रभाव दिसतो आहे. संपूर्ण बाजारात खरेदीसाठी असलेल्या ९० टक्के वस्तू या भारतीय आहेत. ही आपल्या सगळ्यांसाठी आनंदाची बाब आहे.पुढे बोलताना, भारतीय वस्तूंच्या विक्रीमुळे चीनच्या व्यापाऱ्यांना फटका बसल्याचेही त्यांनी नमूद केलं. देशात चीनी वस्तूंच्या विक्रीत मोठ्या प्रमाणात घट झाली आहे. त्यामुळे चीनच्या व्यापाऱ्यांना यंदा १.२५ लाख कोटी रुपयांचे नुकसान होण्याचा अंदाज आहे, असे ते म्हणाले. तसेच नागरिकांनी दिवाळीची खरेदी करताना जास्तीत जास्त भारतीय वस्तूंची खरेदी करावी, असं आवाहनही त्यांनी केलं.याशिवाय ऑल इंडिया ज्वेलर्स अँड गोल्डस्मिथ फेडरेशनचे (एआयजेजीएफ) राष्ट्रीय अध्यक्ष पंकज अरोरा यांनी धनत्रयोदशीला सोन्या-चांदीच्या विक्रीत वाढ झाल्याचं सांगितलं. धनत्रयोदशीच्या दिवशी देशभरात सुमारे २० हजार कोटी रुपयांचे सोने आणि २ हजार ५०० कोटी रुपयांची चांदीची विक्री झाली आहे. भारतीय मानक ब्युरो (इखड) मध्ये जवळपास २ लाख ज्वेलर्स नोंदणीकृत आहेत. त्यांनी आज २५ टन सोने आणि २५० टन चांदीची विक्री केली आहे.

## अजित पवारांचे धक्कादायक आरोप

म्हणाले : सिंचन घोटाळा फाईलवर आबांची सही



मुंबई/पुण्यभूमी प्रतिनिधी

महाराष्ट्राच्या राजकारणात आता प्रचाराची रणधुमाळी जसजशी वाढत आहे, तसतशा आता आरोप-प्रत्यारोपांच्या फैऱ्या वाढणार आहेत. विशेष म्हणजे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची आज सांगलीतील तासगाव येथे सभा पार पडली. या सभेत अजित पवार यांनी राज्याचे दिवंगत माजी गृहमंत्री आर. आर. पाटील यांच्यावर अतिशय गंभीर आरोप केले आहेत. आर. आर. पाटील हे गृहमंत्री असताना त्यांनी ७० हजार कोटींच्या सिंचन घोटाळा प्रकरणात अजित पवार यांची उघड चौकशी व्हावी, या फाईलवर सही केली, असा मोठा आणि अतिशय धक्कादायक आरोप अजित पवारांनी केला. विशेष

पान २ वर...

## पंचतारांकितांचे पायाभूत

साधारण सात वर्षांपूर्वी मुंबईच्या एल्फिन्स्टन रोड स्थानकात सकाळी साडेदहाच्या सुमारास चेंगराचेंगरी होऊन दोन डझन मुंबईकरांचे प्राण गेले. सकाळी साडेदहा ही गर्दीची वेळ. मुंबईकर चाकरमाने लाखांच्या संख्येत या वेळी एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे आपले अस्तित्व मुठीत घेऊन जिवाच्या आकांताने धावत असतात. खरे तर अशा प्रचंड गर्दीच्या वेळी चेंगराचेंगरीचे प्रसंग नित्यनेमाने घडत असतात. त्यात जीव जात नाहीत, इतकेच. पण २०१७ साली २९ सप्टेंबरास ते अनेकांचे गेले. दोन दिवसांपूर्वी वांद्रे स्थानकात झालेली चेंगराचेंगरी ही रामप्रहरी झाली आणि तीत अनेक जायबंदी झाले; सुदैवाने कोणाचा जीव गेला नाही. दुसरे असे की जे जबर जखमी झाले ते मुंबईचे स्थानिक नोकरदार नाहीत. हे सर्व उत्तर प्रदेशातील आपापल्या गावी दिवाळीसाठी निघालेले स्थलांतरित. गावी हातास काही काम नसल्याने मुंबईत लाखोंच्या संख्येने ठिकठिकाणाहून स्थलांतरित दररोज येत असतात. पुढील २३ वर्षांत आपण विकसित होणार असलो तरी त्या विकासाची पहाट अद्याप त्यांच्या त्यांच्या प्रांतांत न उगवल्याने अशा लाखोंना अन्यत्र विस्थापित व्हावे लागते. दक्षिणेतील राज्यांतून दुबईआदी परिसरात लाखो मजूर जात असतात आणि उत्तर भारत, ओरिसा, पश्चिम बंगाल आदी राज्यांतून असे निर्वासित दिल्ली, मुंबई, चेन्नई आदी ठिकाणी पोटार्थ जात असतात. हा सगळा हातावर पोट असलेला वर्ग. बहुतेक अकुशल कामगार. मुंबईचे सेवाक्षेत्र या स्थलांतरितांच्या जिवावर सुरू आहे. पण तरीही या वर्गाचे जगणे सुसह्य होईल अशा कोणत्याही योजना आपल्याकडे नाहीत. इतकेच नाही तर वर्षातून एक-दोन वेळा या सर्वांस आपापल्या मूळ गावी जाण्यासाठी सजीवांच्या प्रवासासाठी लायक किमान सुविधाही आपण देऊ शकत नाही. जे झाले त्यातून आपण एल्फिन्स्टन दुर्घटनेतून शून्य धडा घेतला हे आपले कशातूनच काही न शिकण्याचे सत्य जसे समोर येते तसेच काही प्रश्न उपस्थित होतात.यातील सर्वात कळीचा मुद्दा म्हणजे रेल्वेसारख्या अत्यंत गरजेच्या, सर्वव्यापी सेवेसंदर्भात आपले प्राधान्यक्रम नक्की कोणते? हा प्रश्न पडतो याचे कारण गेल्या पाच वर्षांत रेल्वेच्या अपघातांची संख्या वाढली, हे नाही. या काळातील अपघातांची तीव्रताही अधिक होती, हेही कारण यामागे नाही. आपल्या रेल्वेचा वार्षिक आराखडा साधारण अडीच लाख कोटी रुपयांचा आहे आणि आपल्या रेल्वे जाळ्याची एकूण लांबी आहे ६८,५९४ किमी. यातील बहुतेक मार्गांवर रेल्वे दुहेरी आहे. म्हणजे जाण्याच्या आणि येण्याच्या प्रवासासाठी दोन स्वतंत्र रेल्वे. त्यामुळे ही लांबी दुप्पट होते. इतक्या लांबीची रेल्वे तर सांभाळायचीच पण याच अडीच लाखभर कोटी रुपयांतूनच १२ लाखांहून अधिक कर्मचाऱ्यांचे वेतन/निवृत्तिवेतन, नव्या तांत्रिक सुधारणा, नवे मार्ग इत्यादींचे नियोजनही करायचे आणि खर्चही भागवायचा. हा निधी किती तुटपुंजा आहे हे यावरून कळेल. असे असताना त्याच वेळी फक्त ५०८ किलोमीटरच्या नव्या रेल्वेमार्गासाठी केंद्र सरकार साधारण दोन लाख कोटी रुपये खर्च करताना दिसते. म्हणजे जनसामान्यांच्या रेल्वेचा वर्षभराचा खर्च एकाच मार्गावर. हा अवघा ५०८ किमीचा मार्ग आहे पंतप्रधानांच्या गुजरातची राजधानी अहमदाबाद आणि देशाची आर्थिक राजधानी मुंबई यांस जोडणारा. पंतप्रधानांच्या या लाडक्या आणि भाग्यवान प्रकल्पाचे नाव अर्थातच बुलेट ट्रेन. आताच या मार्गावर डझनांनी रेल्वे आहेत आणि त्याहून अधिक विमानसेवा. तरीही या मार्गावर दोन लाख कोट रुपये खर्च होणार आहेत आणि त्याच वेळी अन्यत्रच्या गरीब, बिचाऱ्या रेल्वेस नवीन किमान सुधारणांसाठी अजूनही वाट पाहावी लागणार आहे. हा भेदभाव इतक्यापुरताच मर्यादित नाही.वांद्रे येथे चेंगराचेंगरीत जखमी झालेले हे प्राधान्याने या वर्गातील प्रवासी होते. त्यामुळे त्यांची दखल कोणीही घेतली नाही. आणि घेतली जाणारही नाही. हे वास्तव कटू खरे; पण ते मान्य करण्याखेरीज पर्याय नाही. या वास्तवास दुसरी किनार आहे ती दररोज ५०-५० गाड्या अतिरिक्त सोडल्या तरी कमी न होणाऱ्या या स्थलांतरितांच्या गर्दीची. यातील अनेक गाड्या उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या गोरखपुरास जातात. उत्तर प्रदेशच्या भरभराटीच्या घोषणा योगी नेहमी करतात. त्यांच्या गावातून मुंबईत येणाऱ्या स्थलांतरितांची संख्या जेव्हा कमी होईल, तेव्हा ही भरभराट खरी मानता येईल. तूर्त त्यांच्या प्रदेशातील अभागींस मुंबई वा अन्यत्र असेच चिरडून घ्यावे लागणार. इतके होऊनही पायाभूत सोयीसुविधांचे प्राधान्यक्रम बदलण्याची गरज आपल्या राज्यकर्त्यांस वाटत नसेल तर अशा अभागींची संख्या आणि त्यांचे अनाथपण असेच वाढत राहील; यात शंका नाही.

# लोणार मतदार निवडणूक रणधुमाळी

## निर्णय:संघपाल पनाडांचा उमेदवारी अर्ज दाखल

लोणार/पुण्यभूमी प्रतिनिधी

सर्वप्रथम संत गजानन महाराज, पंचपिर दर्गा, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्थळांना वंदन करून उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी सुरुवात करण्यात आली.मेहकर लोणार मतदार संघातून प्रचंड मायबाप जनता उपस्थित झाली होती.यावेळी सर्व समजाचे, धर्माचे, पंथाचे, कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते. सर्वांनी एकच जयघोष करत गर्जना केली एकच वादा नागवंशी संघपाल दादा संघपाल दादा म्हणजेच मेहकर मतदार संघाचा विकास अशा घोषणेने संपूर्ण मेहकर शहर दणाणून सोडले,यावेळी अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी आपले मत मांडले त्यामध्ये युवा नेते अनित्य घेवंदे यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की नागवंशी संघपाल पनाड यांना घराघरात पोहोचण्याची जबाबदारी आपली आहे. आपणच आपला विकास करण्यासाठी या उमेदवारांना उभे केले आहे त्यासाठी सर्वांना आपल्या उमेदवाराचे नाव चिन्ह आणि पक्ष हे कसे घराघरात पोहोचेल त्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, येणारा काळ हा आपलाच आहे परंतु आपल्यावर



आरोप प्रत्यारोप आरोप होतील, त्याला कुठेही बळी न पडता सर्वांनी नागवंशी संघपाल पनाड यांना ना निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावे.उपस्थितामध्ये तोफीक अली, अख्तर भाई, शाकीर भाई पठाण, बळीभाऊ मोरे,फेरोज गवळी,संतोष भाऊ शिंदे संतोष,सद्दाम भाई,पाटील, गणेश भानापुरे शाकीरभाई पठाण दीपक भाऊ आंभोरे ,महेंद्र मोरे, नागसेन पनाड, महेंद्र पनाड, निळकंठ गवई, रमेश पवार,प्रदिप सानप, अनिल पवार,अनिल आनंदराव,शुध्दोधन सरदार, बिंबीसार पनाड, प्रसेंजीत पनाड,संजय शेजुळ,महेश मोरे, सागर पनाड, विशाल पनाड,राजहंस जावळे, संदेश पनाड, दादाराव पनाड ,राहुल साळवे,रंजीत मोरे विलास खरात, बाळु मोरे, तुळशीराम पनाड, वंशीळाबाई पनाड, सुमनबाई पनाड,सिंधुबाबाई पनाड,हरनाबाई चव्हाण,पाडमुख बाई,नंदाबाई पनाड, कमलबाई पनाड,विजय माला गवई, रूक्मिणीबाई पनाड,केसरबाई गवई,सर्व मायबाप जनतेचे आभार मानले,की माझ्या एकावर हाकेवर आपण या ठिकाणी उपस्थित झालात त्याबद्दल मी मनाच्या गाभाऱ्यातून सर्वांना धन्यवाद देतो तुम्ही माझ्यावर जो विश्वास टाकला आहे त्याला कुठेही तडा न जाऊ देता, मी मतदार संघाचा चेहरा मोरा बदलल्याशिवाय मी थांबणार नाही अशी भावना व्यक्त केली.यावेळी महिला पुरुष कार्यकर्ते सर्व समाजाचे नेतेमंडळी उपस्थित होते.

## ॲड. नरसिंह जाधव यांचा आष्टी तालुक्यात झंजावात

पाटोदा/पुण्यभूमी प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँगेस पक्षाचे विधी सेलचे प्रदेश उपाध्यक्ष आणि शरद पवारांचे कट्टर समर्थक म्हणून ओळखले जाणारे आणि आष्टी विधानसभेचे इच्छूक उमेदवार ॲड. नरसिंह जाधव यांचा आष्टी तालुक्यातील गावागावांत उत्सूर्फतपणे लोक स्वागत करीत असल्याने ॲड. जाधव यांनी सलग आष्टी तालुक्यातील गावांमध्ये संपर्क दौरा सुरु ठेवला आहे. यावेळी लोक आम्हाला आता मतदारसंघात नवीन नेतृत्वाची गरज असल्याचे बोलून दाखवित असून, आम्ही तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा विश्वास देत असल्याने, ॲड. जाधव यांच्या झंजावात आष्टी तालुक्यात सुरु असून, मतदारसंघातील गावोगावच्या पारावर, हॉटेल-टपर्यावर सर्वत्र लोक जाधव यांच्याच नावाची चर्चा होऊ लागली आहे.

ॲड. जाधव यांनी आष्टी तालुक्यातील किन्ही, बेलगाव, डोईठान, बीड सांगवी, गांधनवाडी, जोगेश्वरी पारगाव, टाकळसिंग, खेडकर सांगवी, हरिनारायण आष्टा, आष्टा आदी गावांत जाऊन लोकांशी थेट संपर्क साधला. यावेळी ग्रामस्थांकडूनही त्यांचे उत्स्फूतपणे स्वागत करण्यात येत असून, एनकांनी तर प्रस्थापित नेतृत्वाविरुध्दची नाराजी व्यक्त करुन आता मतदारसंघाला नव्या नेतृत्वाची गरज असल्याचे बोलले जात आहे. मराठा समाजातील सामान्य घरातील उमेदवार म्हणून ॲड. जाधव यांच्याकडे पाहिले जात असल्याने यावेळी आष्टी मतदारसंघात नक्की परिवर्तन घडेल असे ज्येष्ठ पवारांना मानणारे कार्यकते बोलून दाखवित आहेत. यावेळी आष्टा येथील शशिकांत कन्हेरे यांची संभाजी ब्रिगेड बीड जिल्हा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी मौजे चिंचपूर ता. आष्टीचे सरपंच सतीश ढवळे, राष्ट्रवादी पक्षाचे आष्टाचे गटाचे गण प्रमुख चेअरमन चंद्रकांत गळगटे आदी उपस्थित गावकर्यांशी तालुक्यातील विविध सामाजिक राजकीय विषयांवर चर्चा करण्यात आली.



## पान एक वरून

**नागरिकांनो वाट लावून**

बीडमध्ये मल्टीस्टेट संचालकांनी लोकांची दिशाभूल करुन हजारो कोटींना चुना लावलेला आहे.त्यामुळे ठेवीदार आजही मल्टीस्टेटमध्ये अडकलेल्या पैशांसाठी आस लावून बसले आहेत.त्यामध्ये आता अरेबियन ज्वेलर्सची भर पडली आहे. महेबूब रहमान मलिक नावाचा व्यक्ती बीडच्या जनतेला चारचाकी, दुचाकी वाहनांचे प्रलोभने दाखवून सोने खरेदी करा, म्हणून एक प्रकारे फसवणूक करतो आहे. त्यामुळे पोलीस अधीक्षक यांनी ही बाब गंभीरपणे लक्षात घेणे आवश्यक आहे. कारण लोकांची पून्हा फसवणूक झाली तर त्यांचे मोठे आर्थिक नुकसान होईल. अरेबियन ज्वेलर्स नावाची संस्था लोकांना आमिष दाखवून सोने खरेदी करुन गुंतवणूक करण्याचे आवाहन करत आहे. त्यामुळे जनतेने सावध राहिलं पाहिजे. तसेच अरेबियन ज्वेलर्समध्ये मनी सर्क्युलेशन, मनी लॉन्ड्रिंग होत असून योग्य ती चौकशी करुन कारवाई करण्यात यावी अशी मागणी.प्रा. सचिन उबाळे यांनी केली आहे.

**भारतीय सैनिकांना पूर्वीप्रमाणे**

लष्करातील सूत्रांनी द इंडियन एक्सप्रेसशी बोलताना सांगितलं, की दोन्ही देशांनी या भागातील सैन्यही मागे बोलवलं आहे. तसेच या भागातील अस्थायी चौक्या हटवण्याची प्रक्रिया जवळपास संपुष्टात आली आहे. आता दोन्ही देशांच्या अधिकारी या भागांची पाहणी करत आहेत. या पाहणीदरम्यान ड्रोन्सची मदतही घेतली जात आहे.ही पाहणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर भारतीय सैनिकांना पूर्वीप्रमाणे गस्त घालता येणार आहे. मात्र, भारतीय सैनिकांना याची पूर्व कल्पना चीनच्या सैनिकांना देणे बंधकारक आहे. गस्त घालताना दोन्ही देशांच्या सैनिकांमध्ये कोणताही तणाव निर्माण होऊ नये, हा यामागचा उद्देश आहे. महत्त्वाचे म्हणजे अशाचप्रकारची व्यवस्था आता अरुणाचल प्रदेश सीमेवरील वादग्रस्त भागांमध्ये लागू करण्याचा प्रयत्न असल्याचे लष्काराच्या सुत्रांनी सांगितलं आहे.खरं तर मे २०२० पासून भारत आणि चीन सैन्यामध्ये सीमेवर तणाव आहे. जून २०२० मध्ये गलवान खोऱ्यात झालेल्या झटापटीनंतर दोन्ही देशांमध्ये तणाव निर्माण झाला होता. यामुळे २० जवान शहीद झाले होते. तर अनेक चिनी सैनिकही मारले गेले होते. गेल्या काही दशकांतील हा सर्वांत भीषण संघर्ष होता. जोपर्यंत चीनबरोबरचे संबंध सामान्य होत नाही तोपर्यंत सीमेवर शांतता प्रस्थापित होणे अशक्य असल्याचे मत भारताने मांडलं होतं. त्यासाठी भारताने देपसांग आणि डेमचोक भागातून चीनी सैन्याला हटविण्यासाठी दबाव वाढविला होता. चर्चेच्या अनेक फेऱ्या पार पडल्यानंतर काही दिवसांपूर्वी या भागातून सैन्य मागे घेण्यावर दोन्ही देशांनी सहमती दर्शवली होती.

**शरद पवारांचे 'ते' वक्तव्य**

योजनेवरुन केलेल्या टीकेवरही प्रतिक्रिया दिली. लाडकी बहीण योजनेतून महिलांना पैसे देण्याचे काम केले. आम्ही त्या ठिकाणी कोणाचा करेक्ट कार्यक्रम करत नाही. करेक्ट कार्यक्रमाने माझ्या माय माऊलींना पैसे मिळणार नाहीत. करेक्ट कार्यक्रमाने माझ्या महिला-भगिनींना नोकरी मिळणार नाही. सांगायला खूप सोपं आहे. करेक्ट कार्यक्रम करतो, करेक्ट कार्यक्रम करायचं कोणाच्याही हातात नाही. करेक्ट कार्यक्रम करायचे जनतेच्या हातात आहे. लाडकी बहीण योजना बंद करणार, असे म्हणतात. ती योजना काय तुमच्या काकाची आहे का?, असा सवाल अजित पवार यांनी केला.

**'घटना घडतात, भांड्याला भांडे लागतात' :** योजना सगळी विचार करून दिली आहे. मी १० वर्ष अर्थमंत्री म्हणून काम केलं आहे. आजही अर्थमंत्री आहे. अल्पसंख्याक समाजात नेरिटीव्ही सेट करण्याचा प्रयत्न केला गेला. पण आम्ही सगळ्यांचे आहोत. घटना घडतात. भांड्याला भांडे लागतात, पण त्यांचा संसार पुन्हा कसं उभं करायचं, यासाठी आम्ही काम करतोय. शाहू, फुले, आंबेडकरांचा विचार घेऊन आम्ही काम करतोय. योजना चालू ठेवायचं असेल तर कमळ, धनुष्यबाण आणि घड्याळचं बटन दाबा, असं अजित पवार म्हणाले.

**ट्रम्प यांच्या रॅलीतून वांशिक**

वक्त्यांनी कॅरेबियन बेट 'पोर्तो रिको'ला कचऱ्याचे तरंगणारे बेट असे संबोधले. 'मला माहीत नाही, परंतु सध्या समुद्राच्या मध्यभागी कचऱ्याचे एक तरंगते बेट आहे. मला वाटते की याला 'पोर्तो रिको' म्हणतात,' असे टोनी हिंचक्लिफ म्हणाले. हिंचक्लिफ हे 'स्टँड-अप कॉमेडियन' असून, ज्यू आणि कृष्णवर्णीय लोकांबद्दल असभ्य आणि वर्णद्वेषी टिप्पणी केल्याबद्दल ते आधीच वादात आहेत.दरम्यान, या टिप्पणीवर सर्वच स्तरातून टीका होऊ लागल्याने ट्रम्प यांच्या समर्थकांनी त्यांचा बचाव करण्याचा प्रयत्न केला आहे. हिंचक्लिफ यांचे हे विधान ट्रम्प किंवा त्यांच्या निवडणूक प्रचार मोहिमेचे विचार प्रतिबिंबित करत नसल्याचे वरिष्ठ सल्लागार डॅनियल अल्वारेझ यांनी एका निवेदनात म्हटले आहे. परंतु हॅरिस यांच्या समर्थकांनी या टिप्पणीवर जोरदार आक्षेप घेतला आहे. हॅरिस या पेनसिल्व्हेनिया आणि इतर राज्यांमधील पोर्तो रिकन समुदायांचा पाठिंबा मिळवत आहेत. हिंचक्लिफ यांच्या टिप्पणीनंतर पोर्तो रिकोमधील संगीत सुपरस्टार बॅड बनीने हॅरिस यांना पाठिंबा दर्शवला आहे.इतर वक्त्यांनीही ट्रम्प यांच्या प्रचार कार्यक्रमात हॅरिस यांच्याबद्दल जहाल वक्तव्ये केली. ट्रम्प यांचे बालपणीचे मित्र डेव्हिड रेम यांनी हॅरिस यांच्यावर 'ख्रिस्तविरोधी' आणि 'सैतान' असल्याची टीका केली. तर व्यावसायिक ग्रँट कार्डोन यांनी हॅरिस आणि त्यांचे अवैध व्यावसायिक आपल्या देशाचा नाश करतील, असे म्हटले आहे. ट्रम्प यांनी अनेकदा हॅरिस यांच्यावर आक्षेपार्ह आणि वैयक्तिक टिप्पणी केल्या आहेत.

**तलवाड्यात पोलिसांचा**

डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक रूट मार्च घेण्यात आला पोलिस अधीक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पाडकर,उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरू, पोलीस निरीक्षक सोमनाथ नरके,यांच्या नेतृत्वाखाली सीमा सुरक्षा दलाच्या एका तुकडी सह तलवाडा पोलिसांनी हा रूट मार्च केला यावेळी शहरात शांतता पसरली होती दरम्यान आचारसंहितेच्या कालावधीत कोणताही गैरप्रकार होवू नये त्यासाठी तलवाडा पोलीस अलर्ट झाले आहे तलवाडा सह पोलीस स्टेशन हद्दीतील गावात निवडणुका शांततेत व्हाव्यात यासाठी हा रूट मार्च घेण्यात आला आहे.

**अजित पवारांचे धक्कादायक**

म्हणजे आपण आर. आर. आबांना अनेकदा कठीण प्रसंगात मदत केली. पण त्यांनी आपल्या विरोधातील चौकशीच्या फाईलवर स्वाक्षरी केली. याचं आपल्याला खूप वाईट वाटल्याचं अजित पवारांनी आज भर सभेत सांगितलं.मी प्रत्येक वेळेस आबांना आधार दिला, प्रत्येक वेळेस मदत केली. मला एका गोष्टींचं वाईट वाटतं. तो मला म्हणाला की, माझं गृहखातं काढून घेतलं, मला गृहखातं पाहिजे. अमूक पाहिजे तमूक पाहिजे. सर्व दिलं. माझ्याबरोबर २००४ ला बीट लावली होती की, २००४ ला काँग्रेस पक्षा राष्ट्रवादीच्या जास्त जागा लावणार. त्यावेळी स्कोडा गाडीची शर्यत लागली होती. काँग्रेस पेक्षा जास्त जागा निवडून आल्या तर नवी कोरी स्कोडा गाडी देणार. आल्यावर त्याने मला सांगितलं. आपण शब्दाचे पक्के. जास्त जागा निवडून आल्यावर नवी स्कोडा सुपर गाडी त्याच्याघरी पाठवली. उपकार केले नाहीत. पैज लावली होती ती त्याने जिंकली. या पद्धतीने प्रत्येक वेळेस आधार दिला, असं अजित पवार म्हणाले.नंतरच्या काळात आजार झाला. आम्हाला खोटं सांगितलं की, गाल सुजले. पण डॉक्टरांनी आम्हाला सांगितलं. मी त्याला राजाराम बापू करखान्याच्या कार्यक्रमात तंबाखू खाऊ नको, असं सांगितलं होतं. त्याच्यावर टीका केली होती. लोकांना कॅन्सर होतात. साहेबांनाही तो आजार झाला होता. त्यामुळे गप्प बस राव. आपल्याला खूप काम करायचं आहे. मी नसलो की, गुपचूप तंबाखू चोळायचे आणि मी असलो की कुठे दादा काही नाही. पण मी माझ्याकरता सांगत नव्हतो तर मी त्याच्याकरता सांगत होतो, असं अजित पवार म्हणाले.

**अजित पवार यांचे आर. आर. आबांवर आरोप काय? :** हे सर्व दुर्दैवाने झालं. हे काढायची गरज नव्हती. पण नंतर माझ्यावर आरोप झाले. मला बदनाम करण्याचा प्रयत्न झाला. म्हणाले, याच्यावर ७० हजार कोटींचा आरोप करुयात. अजितराव घोरपडे त्या खात्याचे मंत्री होते. माझ्यावर ज्यादिवशी आरोप झाला तेव्हापासून महाराष्ट्राची १ मे १९६० ला निर्मिती होऊन ते आरोपाच्या दिवसापर्यंत पगाराचा आणि सगळा खर्च ४२ हजार कोटींचा झाला आणि मला ७० हजार कोटींचा भ्रष्टाचार केला म्हणाला. खर्च ४२ हजार कोटी आणि भ्रष्टाचार ७० हजार कोटींचा? नाही म्हणे आकडा जितका मोठा तेवढं लोकांना वाटतं असेल बरका, झालं माझी वाटच लागली. त्यातून एक फाईल निर्माण झाली. ती फाईल गृह खात्याला जाते. त्याने त्या फाईलीवर अजित पवारांची उघड चौकशी करावी म्हणून सही केली. केसाने गळा कापायचे धंदे आहेत, असा आरोप अजित पवारांनी केला.

## पान सहा वरून

**रतन टाटा युवारत्न...**आहे ते झाडे नष्ट करू नये म्हणून त्यांनी वेगळ्या प्रकारे गावामध्ये कार्यक्रम राबवले त्यांच्या कार्यकाळामध्ये ग्रामपंचायत हद्दीत पर्यावरण पूरक उत्कृष्ट कामगिरी केली असल्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना इको फ्रेंडली तरुण तगडा भारत आयोजित उद्योजक डॉक्टर अशोक एन जे यांनी आदर्श सरपंच अशोक खरात यांना रतन टाटा युवा रत्न पुरस्कार देऊन सन्मानित केले त्यामुळे त्यांच्यावर जिल्हाभरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे व जिल्हा बाहेरील देखील फोन करून लोक शुभेच्छा देत आहेअशोक खरात यांनी पुरस्कार मिळालेल्या नंतर मनोगत व्यक्त करताना असे म्हणाले की हा सत्कार व पुरस्कार मी माझे आई-वडील गुरुजन वर्ग मित्र नातेवाईक व गावातील प्रत्येक नागरिकांच्या चरणी अर्पण करत आहे.

**प्रेषितांच्या जीवनावर...**महमद इलियास सर यांनी केले व संस्थेच्या वीस वर्षे सेवाचा लेखाजोखा मांडला. गुलाम साकिब सर यांनी अतिशय सुंदर सुत्रसंचलन केले व सय्यद ईदरिस सर यांनी आभार प्रदर्शन केले. इंजिनिअर फैजान अली बागे व समस्त उखाब टीमने अथक परिश्रम घेतले.सर्व उपस्थितांनी बक्षीसपात्र विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या व पुढील आयुष्यात यशस्वी व्हाल अशी अपेक्षा व्यक्त केली. एकुणच कार्यक्रम अतिशय भव्य दिव्य झाला.सर्व मित्रपरिवार व उपस्थित पाहुण्यांनी आयोजकांनी भविष्यात असेच समाजोपयोगी कार्यक्रम घेण्याचे बळ व प्रेरणा दिली.

**यंदा नमिताचा पराभाव ...**मतदारसंघात त्यांच्या कारभारामुळे किती नाराजी दिसून येत आहे. नमितताई मुंदडांच्या दुर्लक्षामुळे दलित मुस्लीम मराठा समाज विकासापासून वंचित दिसून येत आहे. मात्र या गंभीर बाबीकडे आमदार आणि आमदारांचे पती, सासरे जाणून बुजून दुर्लक्ष करीत आहेत. मात्र आ. मुंदडांना फक्त ऊसतोड मजुरांच्या मतांवर डोळा ठेवून बसलेले दिसून येत आहे. मात्र गेल्या पाच वर्षात के ज मतदारसंघातील उसतोड मजुरांसाठी आ. मुंदडांनी पत्रकार परिषद घेऊन काय विकास केला हे जाहीरपणे सांगावे. मात्र स्व. विमलताई मुंदडांनी जे कमविले ते आ. नमिता मुंदडांनी गमावले आहे. सासरच्या कारभारामुळे दलित, मुस्लीम मराठा समाज नाराज झाला. गेल्या पाच वर्षात गुत्तेदार पोसण्याचे काम गेल्या पाच वर्षात झाले. त्यामुळे आ. नमितताई मुंदडा कोट्यावधी रूपये आणून कुठे वापरले? त्या पैशाचा कोठे विकास केला. केवळ कागदावर कोट्यावधी रूपये आणल्याचे दाखविले. मात्र प्रत्यक्षात या कोट्यावधीचा विकास केज मतदारसंघात दिसत नाही अशी चर्चा होत आहे.

**कोणतेही मतभेद किंवा...**म्हणाले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष ऍड.राजेश्वर आबा चव्हाण, ज्येष्ठ नेते दत्ता आबा पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे परळी विधानसभा अध्यक्ष गोविंदराव देशमुख, शिवाजी सिरसाट, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष राजाभाऊ औताडे, विश्वाम्भर फड, रणजित लोमटे, राजवर्धन दौंड यांसह प्रसार माध्यमांचे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.

संपादक : **बाळासाहेब भगवान मस्के**, कार्यकारी संपादक : **सुनिल मसू डोंगरे**

हे दैनिक प्रकाशक,मुद्रक,मालक,संपादक बाळासाहेब भगवान मस्के यांनी बी.एम.प्रिंटर्स ॲन्ड पब्लिकेशन, बीड, ता.जि.बीड येथे छापून दैनिक बीड पुण्यभूमी तहसीलच्यामागे, डीपी रोड बीड (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.
(अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत दुरध्वनी-०२४४२-२९९०८४,ई-मेल-beedpunyabhumi@gmail.com

Daily Beed punyabhumi news paper owner, publisher, Edit Balasaheb Bhagwan Maske has printed at B.M. printexs, behing the tehsil, dp road (Maharashtra) 431122
Published at daily Beed Punyabhumi office, behing the tehsil, dp road, beed -431122 Phone No. (02442)299084, Email-beedpunyabhumi@gmail.com

# मी मागे चुकलो, पण मला सांगा आता कोण चुकलंय? भाषण सुरू असताना अजित पवारांच्या डोळ्यात पाणी

**बारामती :**

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत सर्वात मोठी फाईट असेल ती बारामती मतदारसंघात... बारामतीमध्ये काका विरुद्ध पुतण्या अशी थेट लढत असणार आहे. बारामती विधानसभा मतदारसंघामधून काका अजित पवार आणि पुतणे युगेंद्र पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत.

अशातच आता बारामतीकर कोणाला साथ देणार? असा सवाल विचारला जातोय. अशातच आता अर्ज दाखल केल्यानंतर अजित पवार भाषण करताना भावूक झाल्याचं पहायला मिळालं.

**काय म्हणाले अजित पवार?**

ठिक मी मागे चुकलो, मला सांगा आता कोण चुकलंय, असं म्हणून अजित पवारांना भावना अनावर झाल्या. त्यानंतर बोलताना त्यांनी सभाच भाऊक करून टाकली. घरातलं भांडण चव्हाट्यावर यायला नको होतं, असंही अजित पवारांनी म्हटलं



आहे. आता घरातूनच कोणी उभं केलं तुम्हीच सांगा, असंही अजित पवार यावेळी म्हणाले.

मी आधीही जाहीर केलंय की सुप्रियाविरोधात सुनेत्राला उभं करणं नको होतं. हे मी आजही कबूल करतो. इथं बसलेल्या लोकांपैकी अनेकांनी सुप्रियाला मदत केली. पण ठीक आहे. मी पण बारामतीत काम केलंय, पण काय झोपा नाही काढल्या, असंही अजित पवार म्हणाले.

**आमचं घर कोणी फोडलं?**

आम्ही सगळे तात्यासाहेब पवारांची फॅमिली. आम्ही बिकट परिस्थितीमधून वर आलो, आईने आधार दिला, आई सांगते फॉर्म भरू नका माझ्या दादाच्याविरोधात. हे जे काय चाललं आहे ते बरोबर नाही, मग त्याच्यामध्ये मोठ्या व्यक्तींनी सांगायला पाहिजे होतं, फॉर्म कोणी भरायला सांगितला तर साहेबांनी फॉर्म भरायला सांगितला, म्हणजे साहेबांनी आमचं तात्यासाहेबांचं घर फोडलं का? असा सवाल करताच अजित पवार यांना सभेच्या स्टेजवर अश्रू अनावर झाले.

दरम्यान स्टेजवर अजितदादा यांना अश्रू अनावर झाल्याचं दिसताच सभेला आलेल्या महिला देखील चांगल्याच भावुक झाल्या. 'दादा, आता रडायचं नाही तर लढायचं' अशी जोरदार घोषणाबाजी या सभेला आलेल्या महिला कार्यकर्त्यांनी केली. तसेच इतर कार्यकर्त्यांकडून देखील या ठिकाणी जोरदार घोषणाबाजी करण्यात आली.

पुढे बोलताना अजित पवार म्हणाले की, आपल्या भागातल्या लोकांना कामं दिली, काम चोख झाली पाहिजे, उगीच मलिदा मिळाला पाहिजे, अशी भूमिका नको. कितीतरी कॉन्ट्रॅक्टर अधिकाऱ्याकडे जातात. कुठे काही चुकलं असेल, तर मी दुरुस्त करेन. माणूस आहे चुका करतो आणि स्वीकार करतो. तुम्ही मला मोठं केलं वरच्या पदावर नेलं. टॉपच्या नेत्याच्या ओळखी झाल्या ते काय करतात ते प्रशासन कसं राबवतात हे पाहाता आलं.

मी जनतेला काय देता येईल याचा विचार करतो. मला यावेळी उभा राहिचं नव्हतं, पण कार्यकर्त्यांनी सांगितलं, ही जागा महायुतीमध्ये राष्ट्रवादीला सुटली असं अजित पवार यांनी यावेळी म्हटलं आहे.

# राज ठाकरे अमित ठाकरेंची उमेदवारी मागे घेतील, पण माझी उमेदवारी मागे घेणार नाहीत

## मनसेच्या नेत्याचे मोठे विधान



**मुंबई :**

वरळी विधानसभा मतदारसंघातून माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे पुत्र आणि माजी मंत्री आदित्य ठाकरे हे पुन्हा एकदा निवडणुकीच्या रिंगणात उतरले आहेत. शिवसेनेचा बालेकिल्ला असलेल्या या मतदारसंघात आदित्य ठाकरेंविरोधात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेने मिलिंद देवरा यांना उमेदवारी दिली आहे. तर राज ठाकरेंनी मनसेकडून संदीप देशपांडे यांना उमेदवारी दिली आहे.

संदीप देशपांडे यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी संदीप देशपांडेंनी आदित्य ठाकरेंवर गंभीर आरोप केले.

संदीप देशपांडे यांनी आज वरळी मतदारसंघातून उमेदवारी अर्ज दाखल केला.

यावेळी संदीप देशपांडेंकडून मोठ्या प्रमाणात शक्तीप्रदर्शन करण्यात आले. यापूर्वी संदीप देशपांडेंनी जोरदार भाषण केले. यावेळी त्यांनी आदित्य ठाकरेंवर जोरदार टीका केली. गेल्या काही दिवसांपासून अनेक अफवा उठवल्या गेल्या होत्या की मनसे वरळीतून उमेदवारी अर्ज मागे घेईल. पण आज उमेदवारी अर्ज दाखल करणार आहोत.

राज ठाकरे कोणताही दुसरा निर्णय घेणार नाही. २०१९ ला आपल्या एका कार्यकर्त्याचे तिकीट कापून आदित्य ठाकरेंना तिकीट देण्यात आले होते.

विशेष म्हणजे त्या बदल्यात त्याला काही देण्यातही आलं नाही, असे संदीप देशपांडे म्हणाले.

**"उद्धव ठाकरेंनी दुसऱ्याचा बळी घेऊन स्वतःच्या मुलाला आमदार केलं"**

"आताही अफवा सुरु होत्या की संदीप देशपांडेंना माघार घ्यावी लागणार आहे. अमित ठाकरेंना सपोर्ट करायचा आहे, अशी चर्चा सुरु होती.

पण मी ठामपणे सांगितलं की, राज ठाकरे एक वेळ अमित ठाकरेंची उमेदवारी मागे घेतील, मात्र संदिप देशपांडेची घेणार नाहीत. माझे साहेब राज ठाकरे उद्धव ठाकरे नाहीत की दुसऱ्याचा बळी घेऊन स्वतःच्या मुलाला आमदार करतील".

# उद्धव ठाकरेंना जबर धक्का

## उबाठाने जाहीर केलेला उमेदवार शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश करणार!





**छत्रपती संभाजीनगर :**

महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ चे बिगुल वाजले आहे. राज्यात महायुती आणि महाविकास आघाडी यांच्या लढत पाहायला मिळणार असून सर्वच राजकीय पक्षांकडून जोरदार तयारी केली जात आहे.

महायुती आणि महाविकास आघाडीच्या घटक पक्षांकडून विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर उमेदवारांची यादी जाहीर केली जात आहे. त्यातच आता छत्रपती संभाजीनगरमध्ये शिवसेना ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. जाहीर केलेल्या उमेदवाराने निवडणुकीतून माघार घेतली असून शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार आहे.

शिवसेना ठाकरे गटाचे पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे यांनी संभाजीनगर मध्य मतदारसंघात किशनचंद तनवाणी यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर शिवसेना शिंदे गटाने प्रदीप जैस्वाल यांना निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. या मतदारसंघात एमआयएम कोणाला उमेदवारी देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले होते. एमआयएमकडून नासेर सिद्दिकी यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. एमआयएमचे नेते असदुद्दीन ओवैसी यांनी 'एक्स'वर पोस्ट करीत त्यांचे नाव जाहीर केले आहे.

**किशनचंद तनवाणी शिंदे गटात करणार प्रवेश**

यामुळे छत्रपती संभाजीनगर मध्य मतदारसंघात तिरंगी लढत होणार होती. मात्र, आता शिवसेना ठाकरे गटाचे उमेदवार किशनचंद तनवाणी यांनी निवडणुकीतून माघार घेतल्याची घोषणा केली आहे. छत्रपती संभाजीनगर मध्य मतदारसंघात २०१४ सारखी परिस्थिती म्हणजे एमआयएमचा उमेदवार निवडून येवू नये म्हणून माघार घेत असल्याचे किशनचंद तनवाणी यांनी म्हटले आहे. जाहीर केलेल्या उमेदवाराने अचानक माघार घेतल्याने हा उद्धव ठाकरेंसाठी मोठा धक्का मानला जात आहे.

तर किशनचंद तनवाणी हे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करणार असल्याची माहिती समोर येत आहे. यामुळे छत्रपती संभाजीनगरमध्ये विधानसभेच्या तोंडावर मोठा भूकंप पहायला मिळत आहे.

# शरद पवारांच्या राष्ट्रवादीची ७ उमेदवारांची चौथी यादी जाहीर



**मुंबई :**

२९ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज भरायचा शेवटचा दिवस असल्याने सगळ्या पक्षांकडून राहिलेल्या जागांवर उमेदवार घोषित केले जात आहेत. राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून ७ उमेदवारांची चौथी यादी जाहीर करण्यात आली आहे.

आतापर्यंत शरद पवारांच्या राष्ट्रवादीने ४ याद्या जाहीर केल्या आहेत. पहिल्या यादीमध्ये ४५ जणांना उमेदवारी देण्यात आली होती. दुसऱ्या यादीमध्ये २२ उमेदवार जाहीर केले. तसेच तिसऱ्या यादीमध्ये ९ तर सोमवारी चौथ्या यादीमध्ये ७ उमेदवारांना संधी देण्यात आली आहे. आतापर्यंत राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाकडून ८३ उमेदवार जाहीर करण्यात आले आहेत.

**कोणाकोणाला दिली संधी?**

माण – प्रभाकर घार्गे, काटोल – सलील अनिल देशमुख, खानापूर – वैभव सदाशिव पाटील, वाई – अरुणादेवी पिसाळ, दौंड – रमेश थोरात, पुसद – शरद मैंद, सिंदखेडा – संदीप बेडसे.

# शरद पवार गटात बंडखोरी; धनंजय मुंडे पवारांच्या टार्गेटवर



**परळी:**

महाराष्ट्रात सर्वत्र विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फूट पडल्यामुळे यंदाची निवडणूक खूप खास बनली आहे. अनेक ठिकाणी शिवसेना विरुद्ध शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस, असा सामना रंगणार आहे. विशेष म्हणजे, या पक्षफुटीमुळे यंदा बंडखोरांची संख्याही वाढली आहे. पक्षाकडून उमेदवारी न मिळालेल्या अनेक इच्छुकांनी अपक्ष अर्ज दाखल केला आहे. यामध्ये परळी विधानसभा मतदारसंघाचाही समावेश आहे. येथे शरद पवारांच्या राष्ट्रवादीत बंडखोरी पाहायला मिळत आहे.

धनंजय मुंडेंनी भाजप सोडल्यानंतर शरद पवारांनीच त्यांना आपल्या पक्षात घेऊन विधान परिषदेवर पाठवले होते. पण, राष्ट्रवादीच्या फुटीनंतर मुंडे अजित पवार गटात सामील झाले आणि अनेकवेळा शरद पवार गटावर जहरी टीकाही केली आहे. यामुळे मुंडे सध्या शरद पवारांच्या टार्गेटवर आहेत. धनंजय मुंडेंचा पराभव करण्यासाठी शरद पवारांनी परळीत मराठा कार्ड खेळले आहे. पवारांनी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष असलेल्या राजेसाहेब देशमुख यांना आपल्या पक्षात घेऊन परळीतून उमेदवारी दिली. पण, आता यामुळेच पक्षात बंडखोरी झाली आहे.

**राजेभाऊ फड अपक्ष निवडणूक लढवणार**

काही महिन्यांपूर्वीच राष्ट्रीय समाज पक्ष सोडून राष्ट्रवादी काँग्रेस (शप) मध्ये सामील झालेले राजेभाऊ फड परळीतून निवडणूक लढवण्यास इच्छूक होते. त्यांनी गेल्या अनेक दिवसांपासून याची तयारीदेखील केली होती. धनंजय मुंडेंचा आपणच पराभव करणार, असा निर्धार राजेभाऊ फड यांनी केला होता. पण, शरद पवारांनी त्यांना डावलून राजेसाहेब देशमुख यांना उमेदवारी जाहीर केली. यामुळे राजेभाऊ फड नाराज झाले आणि त्यांनी अपक्ष निवडणूक लढवण्याची घोषणा केली. तसेच, त्यांनी आज आपला उमेदवारी अर्जही दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करताना त्यांनी पक्षाला अल्टीमेटम दिला आहे. उद्यापर्यंत परळीचा उमेदवार बदला, अन्यथा मी अपक्ष निवडणूक लढणार, अशी घोषणा त्यांनी केली.

**पवारांचे मराठा कार्ड**

परळी मतदारसंघात मराठा आणि वंजारी समाजाचे निर्णायक मतदान आहे. शिवाय, मनोज जरांगे पाटील यांच्या मराठा आंदोलनाला परळीतूनही मोठ्या प्रमाणात पाठिंबा मिळाला होता. विशेष म्हणजे, याच जरांगे फॅक्टरमुळे लोकसभा निवडणुकीत भाजप नेत्या पंकजा मुंडे यांचा पराभव झाला अन् मराठा समाजाचे बजरंग बप्पा सोनवणे विजयी झाले. असाच पाठिंबा विधानसभा निवडणुकीत मिळेल, या अपेक्षा ठेवून शरद पवार गटाने परळीत मराठा उमेदवार दिला आहे. विशेष म्हणजे, राज ठाकरे यांच्या 'मनसे'नेदेखील मराठा समाजातील अभिजीत देशमुख यांना उमेदवारी दिली आहे.

# जयश्री थोरातांबाबत आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या वसंत देशमुखांना जामीन मंजूर





**संगमनेर (प्रतिनिधी):**

काँग्रेस नेते बाळासाहेब थोरात यांची कन्या जयश्री थोरात यांच्यावर भाजप नेते सुजय विखे यांच्या सभेत वसंत देशमुखांनी आक्षेपार्ह वक्तव्य केल्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रातून संताप व्यक्त करण्यात आला. देशमुख यांच्या वक्तव्यानंतर संगमनेरमध्ये मोठा गदारोळ झाल्याचे दिसून आले. काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी गाड्यांची जाळपोळ करत देशमुखांना अटक करण्याची मागणी केली. रविवारी पोलिसांनी वसंत देशमुखांना अटक केली. आता आक्षेपार्ह वक्तव्य करणाऱ्या वसंत देशमुखांना जामीन मंजूर झाला आहे.

धांदरफळ येथील सभेत वसंत देशमुख यांनी जयश्री थोरात यांच्याबाबत आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. रविवारी पुण्यातुन स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने वसंत देशमुखांना अटक केली. वसंत देशमुखांना अटक झाल्यानंतर प्राथमिक उपचारानंतर संगमनेर तालुका पोलीस ठाण्यात नेण्यात आले. सोमवारी त्यांना न्यायालयात हजर केले असता संगमनेर न्यायालयाने त्यांना जामीन मंजूर केला आहे.याबाबत संगमनेरचे पोलीस निरीक्षक देविदास ढुमणे म्हणाले की, वसंत देशमुख यांची अटकेपूर्वी तब्येत बिघडल्याने आणि त्यांची बायपास झालेली असल्याने संगमनेर येथे प्राथमिक तपासणी करण्यात आली. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना नाशिक येथील रुग्णालयात भरती करण्यास सांगितले होते. त्यानुसार त्यांना नाशिकमध्ये नेण्यात आले. सोमवारी सकाळी त्यांना संगमनेर न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने वसंत देशमुखांना जामीन मंजूर केला असून त्यांच्यावर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यासाठी त्यांना अतिरिक्त पोलीस अधिक्षक कार्यालयात नेण्यात आल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली.

# रॅली, सभा, शक्तीप्रदर्शन, पण मिनिटाचा उशीर भोवला; सलील देशमुखांचा अर्ज दाखल करुन घेतलाच नाही

**नागपूर:**

कार्यकर्त्यांची प्रचंड गर्दी आणि उत्साह काटोल विधानसभा मतदारसंघाचे मविआचे उमेदवार सलील देशमुख यांना भोवला आहे. झालं असं कि उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठीचे दोन मिनिटांचा उशीर झाल्यामुळे सलील देशमुखांना आपला उमेदवारी अर्ज दाखल करता आला नाही. त्यामुळे आता ते मंगळवारी सकाळी ११ वाजता आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहे. मात्र २०१९ ची पुनरावृत्ती घडली आहे. अनिल देशमुख यांच्या सोबत असेच घडले होते. सोमवारी त्यांच्या पुत्राच्या बाबतीतही असेच घडल्याने जुनी आठवण नव्याने ताजी झाली आहे.



२०१९ मध्ये अनिल देशमुख यांना उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या अखेरच्या दिवसाच्या आदल्या दिवशी (जसं आजचा दिवस आहे) उमेदवारी अर्ज दाखल करताना दोन मिनिटांचा उशीर झाला होता. त्यानंतर अनिल देशमुख यांनी दुसऱ्या दिवशी त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला होता. आज सलील देशमुख यांच्या संदर्भातही तसेच घडले आहे.

उद्या पुन्हा आई-वडील आणि मित्र पक्षांच्या नेत्यांसह येऊन उमेदवारी अर्ज दाखल करेन. आज उमेदवारी अर्ज दाखल करताना एक मिनिटाचा उशीर झाला. बाईकवर येऊन वेळेत पोहोचण्याचा प्रयत्न केला, मात्र एक मिनिट उशीर झाल्यामुळे उमेदवारी अर्ज दाखल करू शकलो नाही, असे ते म्हणाले.

# बुलढाण्यात सातही विधानसभा मतदारसंघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी

## दिग्गज आजी-माजी आमदारांची प्रतिष्ठा पणाला! दोन माजी मंत्र्यांचाही समावेश

**बुलढाणा:**

बुलढाणा जिल्ह्यातील सातही विधानसभा मतदारसंघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी असा संघर्ष होणार आहे. यंदाच्या निवडणुकीत अकरा आजी माजी आमदारांची राजकीय प्रतिष्ठा पणाला लागली आहे. यातील काही ज्येष्ठ आमदारांचे राजकीय भवितव्य ठरविणारी ही निवडणूक आहे. याशिवाय दोन माजी मंत्र्यांची प्रतिष्ठा देखील पणाला लागली आहे, यामुळेही यंदाचा विधानसभा रणसंग्राम लक्षवेधी ठरणार आहे.

भाजपने चारही जागांवर आजी माजी आमदारांना मैदानात उतरविले असून कोणताही 'प्रयोग' करण्याचे टाळले. चिखलीमधून श्वेता महाले, खामगावमधून आकाश फुंडकर आणि जळगावमधून संजय कुटे या आमदारांना तर मलकापूरमधून माजी आमदार चैनसुख संचेती यांना मैदानात उतरविण्यात आले आहे. यातील संजय कुटे हे २००४ पासून सलग आमदार असून माजी मंत्रीसुद्धा राहिले आहे. फुंडकर हे दोनदा तर महाले या मागील लढतीत प्रथमच निवडून आल्या आहेत. या तिघांसमोर काँग्रेसने तुल्यबळ उमेदवार दिले आहे. संचेती हे १९९५ ते २०१४ पर्यंत सलग आमदार



राहिले आहे. मागील लढतीत त्यांचा पराभव झाला होता. त्यांचे ज्येष्ठत्व पाहता भावी राजकारणाच्या दृष्टीने त्यांच्यासाठी यंदाची लढत करो या मरो अशी ठरली आहे.

**शिंगणेंची राजकीय अस्तित्वाची लढाई**

सिंदखेड राजामध्ये राष्ट्रवादीचे आमदार, माजी मंत्री राजेंद्र शिंगणे यांचे भवितव्य पणाला लागले आहे. १९९५ पासून मागील लढतीपर्यंत ते आमदार, राज्य आणि कॅबिनेट मंत्री आणि बुलढाण्याचे पालकमंत्री राहिले आहेत. २०१४ ची निवडणूक त्यांनी लढविली नसली तरी २०१९ मध्ये ते पुन्हा आमदार झाले. यंदा त्यांनी ऐनवेळी अजितदादा गटातून शरद पवार गटात प्रवेश करून तुतारी हाती घेतली. त्यामुळे अजितदादा आणि शिवसेना शिंदे गटाने ही जागा प्रतिष्ठेची बाब केली आहे. यामुळे त्यांच्या समोर राजकीय उत्तरार्धात कडवे आव्हान उभे ठाकले आहे.

**काँग्रेसची कसोटी**

काँग्रेसची जिल्ह्यात पक्षाची पीछेहाट झाली आहे. मागील लढतीत राजेश एकडे (मलकापूर) यांच्या रुपाने केवळ एक जागा मिळाली. आता आमदार एकडेसमोर दुखावलेल्या संचेती यांचे कडवे आव्हान उभे ठाकले आहे. तीन वेळा चिखलीचे आमदार राहिलेले जिल्हा अध्यक्ष राहुल बोन्द्रे यांच्यासाठी यंदाची निवडणूक निर्णायक आहे. त्यांचे राजकीय वजन कमी होणार हे उघड आहे. २००९ पासून सलग तीनदा आमदार झालेले खामगावचे माजी आमदार दिलीप सानंदा यांना २०१४ मधे नवखे आकाश फुंडकर ( भाजप) यांच्याकडून पराभव स्वीकारावा लागला. २०१९ च्या निवडणुकीत मैदानात उतरण्याचे त्यांनी टाळले. त्यामुळे तब्बल १० वर्षांनंतर 'कमबॅक' करण्याचे कडवे आव्हान त्यांच्या समक्ष आहे. जळगावमधून पक्षाने स्वाती वाकेकर यांना सलग दुसऱ्यांदा संधी दिली आहे. त्यांच्या समक्ष आमदार संजय कुटे (भाजप) यांचे प्रबळ आव्हान आहे.

**दोन्ही सेनेसमोर आव्हाने**

यंदा बुलढाणा आणि मेहकरमध्ये सेना विरुद्ध सेना अशी लढत रंगली आहे. लोकसभेतील पराभवामुळे ठाकरे गटासाठी विधानसभा अस्तित्वाची लढाई ठरली आहे. त्यामुळे त्यांनी निष्ठाऐवजी 'निवडून येण्याची क्षमता' या निकषावर उमेदवार दिले आहे. बुलढाण्यात जयश्री शेळके यांच्या समक्ष शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांचे तर मेहकरमध्ये मागील लढतीत आमदारकीची 'हॅट ट्रिक' करणारे शिंदे गटाचे आमदार संजय रायमूलकर यांचे सिद्धार्थ खरात (उबाठा) यांच्या समोर कडवे आव्हान आहे. दीर्घ प्रतीक्षेनंतर जयश्री शेळके यांना विधानसभेची संधी मिळाली आहे. त्यांचे राजकीय भवितव्य ठरविणारी ही लढत आहे.

# बीडमध्ये पुन्हा वारं बदलणार? अखेर जरांगेंचं उमेदवार मैदानात

## ११ जणांनी भरला अर्ज

**बीड :**

विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीला सुरुवात झाली आहे. महायुती आणि महाविकास आघाडीचे उमेदवार जवळपास मैदानात उतरले आहे. आणखी काही जागांची यादी बाकी आहे.

तर दुसरीकडे, लोकसभेला मराठवाड्यात वारं बदलणारे मनोज जरांगे पाटील यांचेही उमेदवार मैदानात उतरले आहे.बीडमध्ये जरांगेंच्या ११ सहकाऱ्यांनी अर्ज दाखल केले आहे.

बीड जिल्ह्यात मनोज जरांगे पाटील यांच्या ११ इच्छुक उमेदवारांनी आज बीड विधानसभेसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. विशेष म्हणजे, हे सगळे उमेदवार एकत्रितरित्या उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी कार्यालयात दाखल झाले होते. यावेळी मोठ्या संख्येनं मराठा समर्थक सोबत होते.

यावेळी जोरदार शक्तीप्रदर्शन करण्यात आलं होतं. बीडमधील एकूण ११ इच्छुक असलेल्या सहकाऱ्यांनी आपले अपक्ष उमेदवारी अर्ज आज एकत्रितरित्या भरले आहेत. दुसरीकडे, मनोज जरांगे पाटलांनी अंतरवालीमध्ये इच्छुक उमेदवारांच्या बैठका घेतल्यात.

त्यानंतर जरांगेंनी आपला अंतिम निर्णय देण्यासाठी ३० तारखेला बैठक बोलावली आहे. ३० तारखेला जो आदेश येईल तो सर्वांना मान्य असेल' असं उमेदवारांनी म्हटलंय.

**सुविचार** - चांगुलपणाचा मार्ग काटेरी असला तरी त्याची फळे गोड असतात.


## आता पुढचे घमासान...!

विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याचा मंगळवार शेवटचा दिवस आहे. आतापर्यंत काही मोजक्या जागा वगळता बहुतेक मतदार संघातील विविध पक्षांचे उमेदवार जाहीर झाले आहेत. त्यामुळे बहुतेक मतदार संघात लढतीचे चित्र जवळपास स्पष्ट झाल्याचे दिसते. अर्थात उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या तारखेपर्यंत प्रतीक्षा करावी लागेल. या चार-पाच दिवसात अजूनही काही नाट्यमय घडामोडी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. माहिममध्ये मुख्यमंत्र्यांनी आपल्या उमेदवाराला माघार घेण्याचे निर्देश दिल्याची बातमी आहे. खरे तर एकनाथ शिंदेंनी त्या ठिकाणी उमेदवार द्यायलाच नको होता. शिंदेंचा उमेदवार जाहीर होण्यापूर्वीच राज ठाकरेंनी तिथून आपल्या मुलाची उमेदवारी जाहीर केली होती. शिंदेंचा उमेदवार आधी जाहीर झाला असता आणि नंतर राज ठाकरेंचा उमेदवार घोषित झाला असता तर शिंदेंना बोलण्यासाठी थोडा फार वाव राहिला असता. शिंदेंचा उमेदवारदेखील तगडा आहे. गेली दोन टर्म सदा सरवणकर त्या मतदारसंघातून निवडून येत आहेत. एकनाथ शिंदे शिवसेनेच्या बाहेर पडले त्यावेळी सदा सरवणकरांनी त्यांना साथ दिली होती. संकटाच्या काळात पाठीशी उभा राहणाऱ्या मित्राला अजून एक त्याग करायला सांगणे म्हणजे मैत्रीची कसोटी पाहण्यासारखेच आहे; परंतु हे काम शिंदेंना करावे लागेल असे दिसते. दुसरीकडे सदा सरवणकर सध्या तरी निवडणूक लढविण्यावर ठाम आहेत. ते आपला उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत, त्यामुळे उमेदवारी मागे घेण्याच्या तारखेपर्यंत नेमके चित्र स्पष्ट होणार नाही. इतरही अनेक मतदारसंघात विविध पक्षांच्या बंडखोरांनी उमेदवारी अर्ज दाखल केले आहेत. त्या सगळ्यांची समजूत काढण्यासाठी पक्ष नेतृत्वाकडे काही दिवसांचा अवधी निश्चित आहे. संभाजीनगरमध्ये तर उद्धव सेनेच्या उमेदवाराने परस्परच आपली उमेदवारी मागे घेतली. त्यामुळे ऐनवेळी धावपळ करून पक्षाला नवा उमेदवार द्यावा लागणार असल्याचे दिसते. हा सगळा घोळ उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या तारखेपर्यंत सुरू राहील, त्यानंतरच लढतीचे खरे स्वरूप स्पष्ट होईल. सध्या तरी महाराष्ट्राची ही निवडणूक चांगलीच रंगतदार होण्याची शक्यता दिसत आहे. महायुतीला आव्हान देणाऱ्या महाविकास आघाडीत जे सामंजस्य आणि सुसंवाद दिसणे अपेक्षित होते तसे दुर्दैवाने दिसले नाही. जागावाटपावरून तिन्ही पक्षांमध्ये आणि खास करून काँग्रेस, उद्धव सेनेमध्ये चांगलीच खडाजंगी झाली, अजूनही सुरू आहे. त्यामुळे मतदारांमध्ये चांगला संदेश जात नाही. महायुतीतही वाद आहेतच; परंतु ते ठळकपणे लोकांसमोर येऊ नयेत याची दक्षता महायुतीचे नेते घेत असल्याचे दिसते. दोन महिन्यांपूर्वी किंवा लोकसभा निवडणुकीनंतरच्या काळाचा विचार केला तर तेव्हा राज्याचे वातावरण निःसंशय महाआघाडीच्या बाजूने होते. त्यामुळेच हरियाणासोबतच महाराष्ट्राची विधानसभा निवडणूक घेण्याचे सत्ताधाऱ्यांनी टाळले. या दरम्यानच्या काळात सत्ताधाऱ्यांनी 'डॅमेज कंट्रोल'साठी भरपूर प्रयत्न केले. त्यात काही प्रमाणात यश मिळाल्याचे दिसत आहे. त्यामुळे दोन महिन्यांपूर्वी एकतर्फी वाटणारी निवडणूक आता मात्र तुल्यबळ झाली आहे. अर्थात दोन्ही आघाड्यांमधील सहभागी पक्षांपुढे आपली मते ज्या ठिकाणी मित्रपक्षाचा उमेदवार आहे त्याच्याकडे वळविणे हे एक मोठे आव्हानात्मक काम आहे. लोकसभेत नेमके तेच झाले होते. महायुतीत मित्र पक्षांच्या कार्यकर्त्यांनी, स्थानिक नेत्यांनी त्या त्या उमेदवारामागे आपली पूर्ण ताकद लावली नाही. हर्षवर्धन पाटलांनी तर आता तशी उघड कबुली दिली आहे. इतर अनेक नेत्यांनी तेच केले. त्याचा फटका मोठ्या प्रमाणात महायुतीला आणि काही प्रमाणात आघाडीलाही बसला. आताही पाडापाडीचे राजकारण तसेच रंगले तर अनपेक्षित निकाल समोर येऊ शकतात. उद्धव ठाकरेंनी हीच चिंता व्यक्त केली होती, अर्थात इतरांनाही ही काळजी आहेच. त्यामुळे आपल्या स्थानिक नेत्यांची समजूत काढण्यात पक्ष नेतृत्वाला कितपत यश येते यावर बरेच काही अवलंबून आहे. जागावाटप, उमेदवारी हा पहिला टप्पा आता पार पडला आहे. उमेदवारी मागे घेण्याची मुदत संपल्यानंतर पुढचे आणि खरे धुमशान सुरू होईल. पडद्यामागून कोण कुणाचे पाय छाटेल हे सांगता येणार नाही. पाडापाडीचे राजकारण सगळ्याच मतदारसंघात रंगणार आहे, कुठे त्याचे प्रमाण तीव्र असेल कुठे कदाचित कमी असेल; परंतु या राजकारणाचा फटका आघाडीतील सगळ्याच म्हणजे सहाही पक्षांना बसण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्थात हे प्रत्येक निवडणुकीतच होत असते, यावेळी नेहेमीचे प्रतिस्पर्धी नसल्याने थोडे वेगळे चित्र आणि परिणाम पाहायला मिळणार आहे.

## पुन्हा एकदा 'प्रिंटिंग मिस्टेक'...!

विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील एका मुद्यावर बोलताना त्यांनी ती 'प्रिंटिंग मिस्टेक' होती, असा खुलासा केला होता आणि त्यावर त्यावेळी बरेच वादळही उठले होते. विलासरावांच्या त्या वक्तव्याचे स्मरण होण्याचे कारण म्हणजे तोच शब्दप्रयोग संजय राऊत यांनी उपरोधाने करीत काँग्रेसला पुन्हा एकदा डिवचले आहे. दक्षिण सोलापूर मतदारसंघाच्या उमेदवारीवरून या दोन्ही पक्षांमध्ये वाद झाला आहे. या मतदारसंघातून उद्धव ठाकरे गटाने आधीच आपल्या उमेदवाराची घोषणा केली होती; परंतु असे असतानाही काँग्रेसनेही त्या मतदारसंघात उमेदवार घोषित केला. त्यामुळे संजय राऊतांनी काँग्रेसला टोला लगावत कदाचित दक्षिण सोलापूरच्या उमेदवाराची घोषणा ही काँग्रेसची 'प्रिंटिंग मिस्टेक' असावी असे वक्तव्य केले. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी मात्र दक्षिण सोलापूरमधून उमेदवार देण्याचा निर्णय पक्षाच्या वरिष्ठ पातळीवरून झाला असून त्यासंदर्भात काही चर्चा करायची असेल तर पक्षश्रेष्ठींसोबतच करावी लागेल, असे सांगत संजय राऊतांना हा विषय 'क्लोज' करण्याचा सल्ला दिला. विदर्भात काँग्रेसने ठाकरे गटाला पुरेशा जागा दिल्या नाहीत म्हणून आधीपासून ठाकरे गट काँग्रेसवर आणि खासकरून नाना पटोलेंवर नाराज आहे. नाना देखील ठाकरे गटाच्या प्रत्येक हल्ल्याला त्याच तोडीचे प्रत्युत्तर देताना दिसतात. विदर्भात काँग्रेसची ताकद अधिक आहे, त्यामुळे काँग्रेस अधिक जागा लढणार हे स्पष्ट करीत त्यांनी विदर्भात अन्याय झाल्याचे सांगणाऱ्या ठाकरे गटाने कोकणात काँग्रेसला किती जागा सोडल्या याचाही हिशेब द्यावा, असे अप्रत्यक्षपणे ठाकरे गटाला सुनावले आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपात कोकणात काँग्रेसच्या वाट्याला एकही जागा आलेली नाही. दक्षिण सोलापूर प्रमाणेच अन्य काही मतदारसंघावरही काँग्रेस तथा ठाकरे गटाने दावा केला आहे. उमेदवारी दाखल करण्याचा मंगळवार शेवटचा दिवस आहे. त्यामुळे मंगळवारपर्यंत दोन्ही पक्षांकडून अजून काही 'प्रिंटिंग मिस्टेक' होण्याची शक्यता नाकारता येत नाही. उमेदवारी मागे घेण्याच्या तारखेपर्यंत या 'मिस्टेक' दुरूस्त केल्या जाऊ शकतात, तशा त्या झाल्या नाही तर आघाडीमध्येच मोठी 'मिस्टेक' निर्माण होऊ शकते.

## स्थित्यंतर




राही भिडे

9867521049



# सर्वपक्षीय घराणेशाहीचा विजय असो!

विधानसभा मतदारसंघातील उमेदवारांच्या सर्वपक्षीय याद्या पाहिल्या, तर त्यात प्रामुख्याने ठराविक घराण्याचाच वरचष्मा दिसतो. इतरांवर घराणेशाहीचा आरोप करणारा भाजपही धुतल्या तांदळासारखा नाही, त्यांच्या साधनशुचितेची ऐसीतैसी त्यांनी स्वतःच करून टाकली आहे. हे निवडणुकीतील उमेदवार याद्यांवरून स्पष्ट होते. सर्वच पक्ष निवडून येण्याचा निकष लावून घराणेशाहीला प्रोत्साहन देत असल्याचे स्पष्ट होत आहे.

देशात मुलायमसिंह यादव यांच्या कुटुंबातील सर्वाधिक सदस्य संसदीय राजकारणात होते. शरद पवार यांच्यावर घराणेशाहीचा आरोप केला जात आहे. ते ठराविक घराण्यातील प्रस्थापितांना पुढे आणतात, अशी टीका त्यांच्यावर केली जाते. शरद पवार यांच्या घरातच तीन खासदार आणि दोन आमदार आहेत. आता पवार घराण्याची तुलना मुलायमसिंह यादव यांच्या घराण्याशी केली जाते. लालूप्रसाद यादव यांच्या कुटुंबातही अशीच नातेवाईकांची मांदियाळी राजकारणात आहे. हरियाणामध्ये देविलाल, चौटाला, भजनलाल या सर्वजणांची कुटुंबे राजकारणात प्रस्थापित झाली आहेत. दक्षिण भारतातील हीच स्थिती आहे. करुणानिधी यांची तिसरी पिढी आता राजकारणात पुढे आली आहे. महाराष्ट्रातही शरद पवार, बाळासाहेब विखे पाटील, भाऊसाहेब थोरात, शंकरराव चव्हाण, भाऊसाहेब हिरे, शंकरराव काळे, शंकरराव कोल्हे, शंकरराव मोहिते पाटील, वसंतदादा पाटील, बाबूराव दादा तनपुरे, मारुतराव घुले पाटील, वसंतराव नाईक अशा मोठ्या नेत्यांच्या तिसऱ्या पिढीतील नेते वेगवेगळ्या निवडणुकांच्या माध्यमातून राजकारणात सक्रिय आहेत. लोकसभेच्या निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रात निवडून आलेले चार खासदार एकमेकांशी या ना त्या कारणाने नातेसंबंध असलेले आहेत. एकीकडे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०२४ रोजी स्वातंत्र्यदिनी केलेल्या भाषणात घराणेशाहीवर टीका केली होती. एक लाख कुटुंबातील तरुणांना आम्ही पुढे आणू इच्छितो, ज्यांचा राजकीय घराण्यांशी कोणताही संबंध नाही, ज्यांचे आई, वडील, भाऊ, बहीण, काका, मामा असे कोणीही राजकारणात नाहीत. पंचायत, नगरपालिका, जिल्हा परिषद अशा विविध माध्यमातून राजकारणात येऊ इच्छितात, त्यांना आम्ही बळ देऊ. राजकीय घराणेशाहीपासून, जातीयवादापासून मुक्ती मिळवण्यासाठी आणि लोकशाही व्यवस्था बळकट करण्यासाठी हे पाऊल महत्त्वाचे असेल, असे मत मोदी यांनी व्यक्त केले होते; परंतु देशात भारतीय जनता पक्षाच्या अनेक नेत्यांच्या घराणेशाहीकडे त्यावेळी त्यांनी सोयीस्कर दुर्लक्ष केले होते. विजयाराजे शिंदे, ज्योतिरादित्य शिंदे, वसुंधरा राजे शिंदे हे काही भाजपातील घराणेशाहीचे अपवादात्मक उदाहरण नाही. दक्षिणेत माजी मुख्यमंत्री बी. एस. येदियुरप्पा आणि त्यांची मुले वेगवेगळ्या पदावर आहेत. यशवंत सिन्हा, जयंत सिन्हा, प्रेमकुमार धवल, अनुराग ठाकूर, सुषमा स्वराज, बासंती स्वराज अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. महाराष्ट्रात अशी उदाहरणे कमी नाहीत. भारतीय जनता पक्ष त्यांना लोक चळवळीतून आलेल्या नेत्यांचे कर्तृत्व असे संबोधत असला, तरी वस्तुस्थिती काय हे जनतेला चांगलेच माहीत आहे. काँग्रेसवर नेहमीच घराणेशाहीचा ठपका ठेवला जातो; परंतु घराणेशाही सर्वच पक्षात आहे. त्यामुळे कुणी कोणाला दोष देण्यात अर्थ नाही; इतरांच्या डोळ्यातले कुसळ तेवढे दिसते, पण स्वतःच्या डोळ्यातील मुसळ मात्र दिसत नाही. नितीन गडकरी यांचा अपवाद वगळला, तर भाजपतील बहुतांशी नेत्यांनी घराणेशाहीला कुरवाळले आहे. एकाच नेत्याचे अनेक नातेवाईक वेगवेगळ्या पक्षात सक्रिय असतात. उदाहरणार्थ, एकमेकांचे कट्टर विरोधक असलेले विखे आणि त्यांचे प्रतिस्पर्धी बाळासाहेब थोरात या दोघांनी आपआपल्या मतदारसंघात सर्व प्रकारच्या विकासकार्यात आणि राजकीय पदांवर नातेवाईकांचीच वर्णी लावली. बाळासाहेब विखे पाटील अर्थराज्यमंत्री असताना त्यांनी एलआयसीसह वेगवेगळ्या वित्तीय संस्थांवर स्वकियांचीच वर्णी लावली होती. विखे यांचे नातेवाईकही वेगवेगळ्या पदावर आहेत. मुलगा राज्य मंत्रिमंडळात, सून जिल्हा परिषद अध्यक्ष, व्याही एका दूध संघाचे अध्यक्ष, मावसभाऊ मंत्री, एक मावसभाऊ जिल्हा परिषदेत असा जवळपास सर्वांचाच गोतावळा असतो. राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने दिलेल्या उमेदवारीत घराणेशाहीतील अनेकांचा समावेश आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटातही घराणेशाही पुरेपूर भरलेली आहे. त्यांच्या पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे हे खासदार आहेत. त्यांची मुलगी आदिती राज्याच्या मंत्रिमंडळात आहे, तर तटकरे यांच्या मुलाला भाजपकडून उमेदवारी दिली जाण्याची शक्यता आहे. अजित पवार यांनी मध्यंतरी विधान परिषदेवर छगन भुजबळ यांचे पुत्र पंकज यांना आमदार म्हणून नियुक्त केले. त्यावरून पक्षातच नाराजी व्यक्त करण्यात आली. भुजबळ स्वतः राज्याच्या मंत्रिमंडळात आहेत. पुतण्याला उमेदवारी न मिळाल्याने त्याने बंड केले आहे. नव्या मुंबईतील गणेश नाईक यांना भाजपने ऐरोली मतदारसंघातून विधानसभेसाठी उमेदवारी दिली असताना त्यांचे चिरंजीव संदीप नाईक यांना बेलापूरमधून उमेदवारी न मिळाल्याने त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरदचंद्र पवार गटात प्रवेश करून तेथून उमेदवारी मिळवली आहे. असाच प्रकार नारायण राणेंच्या बाबतीतही घडला आहे. नारायण राणे भाजपचे खासदार आहेत. त्यांचे चिरंजीव नितेश राणे आमदार आहेत. आता नीलेश राणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश करून निवडणुकीत उतरायचे ठरवले आहे.

भाजपत प्रवेश केलेल्या अशोक चव्हाण यांना राज्यसभेची लॉटरी लागल्यानंतर त्यांची कन्या श्रीजया हिला भाजपने उमेदवारी दिली आहे. अशोकरावांचे मेहुणे अन्य पक्षातून लढत आहेत. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचे चिरंजीव आदित्य यांना वरळी मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे तर त्यांचे चुलत बंधू अमित ठाकरे हे मनसेकडून माहीम विधानसभा मतदारसंघातून निवडणुकीच्या रिंगणात उतरणार आहेत. खा. संदीपान भुमरे यांचे चिरंजीव विलास भुमरे यांना शिंदे गटाने पैठणमधून उमेदवारी दिली आहे. भाजपने आशिष शेलार आणि त्यांचे बंधू विनोद यांना उमेदवारी देण्याचे घाटत आहे. शरद पवार गटातील खासदार नीलेश लंके यांनी पारनेर विधानसभा मतदारसंघातून अन्य कार्यकर्त्याला संधी देण्याऐवजी पत्नी राणी लंके यांना विधानसभेची उमेदवारी आणल्याने तेथे महाविकास आघाडीतच मोठ्या प्रमाणात बंड झाले आहे. शिंदे गटाने आनंद आडसूळ यांचे चिरंजीव अभिजीत यांना दर्यापूरमधून उमेदवारी दिली आहे. एरंडोलमधून चिमणराव पाटील यांचे चिरंजीव अमोल पाटील यांना शिंदे यांनी निवडणुकीच्या रिंगणात उतरवले आहे. अनिल बाबर यांचे चिरंजीव सुहास बाबर यांना सांगली जिल्ह्यातील खानापूर मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे. शिंदे गटातून खासदार झालेल्या रवींद्र वायकर यांच्या पत्नी मनीषा वायकर यांना मुंबईतील जोगेश्वरी पूर्वमधून उमेदवारी देण्यात आली आहे. रत्नागिरीतून उद्योगमंत्री उदय सामंत यांना उमेदवारी दिल्यानंतर राजापूर मतदारसंघातून त्यांचे भाऊ किरण सामंत यांनाही उमेदवारी देण्यात आली आहे. काँग्रेसने विलासराव देशमुख यांच्या बंधूंना आणि मुलगा या दोघांनाही उमेदवारी दिली आहे. एकूणच राज्यातले राजकारण पाहिले तर कोणताही पक्ष घराणेशाही डावलत नाही हेच स्पष्ट होते.

## सरळ-सरळ




राजेश राजोरे

9822593903


# दिवाळीत 'दिवाळे' : ऑनलाईन फसवणूक

प्रत्यक्षात ऑनलाईन व्यवहार खात्री करुन काळजीपूर्वक करणे, पिन सुरक्षितपणे ठेवणे, हा तपशिल कोणाशीही शेअर न करणे, कोणतेही अॅप डाऊनलोड करण्यापूर्वी त्याची सत्यता तपासणे, अनोळखी व्यक्तींनी व गरज नसतांना आलेल्या कोणत्याही लिंकवर 'क्लिक' न करणे, ऑनलाईन कुठल्याही आमिषाला व ऑफर्सच्या मोहात न पडणे, कोणीही फुकट काहीही देत नाही हे समजणे, पुरेसे ज्ञान प्राप्त करणे, आदी सावधगिरीचे उपाय आहेत.

**भरे बाजार में**
**सच की दुकानों पर है सन्नाटा**
**तिजारत झुठ की चमकी हैं**
**मक्कारी की बातें हैं।**

आज धनत्रयोदशी. पाच दिवसाच्या दिवाळीची सुरुवात. सद्यस्थितीत दिवाळीचा माहौल आहे. दिवाळी निमित्ताने बाजारात प्रचंड उलाढाल होते. तशीच लाखो कोटीची उलाढाल आता ऑनलाईन होवू लागली आहे. दरम्यान ऑनलाईन फसवणुकीचे हजारो प्रकार असून नवनवीन फसवणूक प्रकाराची दररोज भर पडत आहे. तेव्हा दिवाळीच्या या धामधुमीमध्ये 'दिवाळे' निघणार नाही, आपले बँक खाते रिकामे होणार नाही, व्यवहारात वस्तू, पैसे, भावनेच्या बाबतीत आपली फसवणूक होणार नाही, याची काळजी प्रत्येकाने घ्यायची आहे. तशी घटना घडल्यास तक्रारीसाठी सायबर सेल, पोलीस स्टेशन आहेत, मात्र तेथून आपली रक्कम मिळतेच, असे नाही. उलट फसवणुकीचे नवनवीन प्रकार पाहता गुन्हेगारांचे, हॅकर्सचे एवढे डोके चालतेच कसे? असा प्रश्न पडतो. एवढी बुध्दी चांगल्या कामात प्रामाणिकपणे लावून परिश्रम केले तर स्वतःचे, समाजाचे व देशाचे भले होवू शकते. मात्र नाही, कुणालातरी लुटण्यासाठी, बरबाद करण्यासाठी फसवणुकीचे असे प्रकार केल्या जातात. ही सामाजिक चिंतेची बाब आहे.

सोशल मीडियावर जागृती करणारा एक व्हिडीओ व्हायरल होत असून मोबाईलवर फसवणुकीचा आलेला नवीन प्रकार अनेकांची फसवणूक करणारा ठरला आहे, असे यामध्ये सांगून सविस्तर माहिती त्यात देण्यात आली आहे. आपण मोबाईलमधून एखादा व्यवहार पूर्ण केला की, आपला मोबाईल अचानकपणे बंद पडणे, फोन बंद-सुरु किंवा काहीही केले तरी फोन सुरु न होणे आणि स्क्रीनवर मोबाईल सुरु करण्यासाठी अमूक ओटीपी टाका, असा मॅसेज येणे आणि ओटीपी टाकला की फोन पे, गुगल पे, आपल्या बँक खात्यातील बॅलेन्स उडून जाणे, असा हा नवीन प्रकार आहे. तर या प्रकारातून अनेकांची फसवणूक होत आहे.

मागील काही वर्षांपासून सामाजिक, भावनीक, वैद्यकीय व राजकीय अशी विविध कारणे दाखवून व्होट करा, मदत करा, ठराव पाससाठी होकार कळवा, यासाठी मतदान करा, जिंका, विनामूल्य मिळवा, नोकरी मिळवा, असे मॅसेज करुन खोट्या, फसव्या लिंक देणे, ओटीपी देणे, तर फोन धारकाने प्रतिसाद देताच बँक, बॅलेन्स उडविणे, असे प्रकार आता नवीन राहिलेले नाहीत. अनोळखी व्यक्तीला अर्जंट कामासाठी फोन देणे, किंवा तो म्हणेल तो क्रमांक लावून देणे, एटीएम कार्डची अदलाबदल करुन फसवणूक होणे, ऑर्डर बुक केली तर कचरा येणे, खराब वस्तू येणे, वस्तू बदलून येणे आदी प्रकार नवीन राहिलेले नाहीत. असे शेकडो प्रकार अस्तित्वात असतांना 'फोन बंद होणे व सुरु करण्यासाठी ओटीपी येणे, आणि त्यातून आर्थिक फसवणूक होणे हा प्रकार नवीनच आणि गंभीर असा म्हणावा लागेल.' तेव्हा ऑनलाईन व्यवहार करणाऱ्यांनी खूप सावध होण्याची व सुरक्षित राहण्याची गरज आहे.

प्रत्यक्षात ऑनलाईन व्यवहार खात्री करुन काळजीपूर्वक करणे, पिन सुरक्षितपणे ठेवणे, हा तपशिल कोणाशीही शेअर न करणे, कोणतेही अॅप डाऊनलोड करण्यापूर्वी त्याची सत्यता तपासणे, अनोळखी व्यक्तींनी व गरज नसतांना आलेल्या कोणत्याही लिंकवर 'क्लिक' न करणे, ऑनलाईन कुठल्याही आमिषाला व ऑफर्सच्या मोहात न पडणे, कोणीही फुकट काहीही देत नाही हे समजणे, पुरेसे ज्ञान प्राप्त करणे, आदी सावधगिरीचे उपाय आहेत. तर फसवणूक झाल्यास पोलीस स्टेशनमध्ये, बँकेत तातडीने तक्रार करण्याची व्यवस्था आहे. तातडीने केलेल्या तक्रारींचा राष्ट्रीय हेल्पलाईन मार्फत काहींना फायदाही झालेला आहे.


भारतात ऑनलाईन गेमिंग प्लॅटफॉर्म वापरणाऱ्या लोकांची संख्या प्रचंड आहे. कारण याचेवर बंदी नाही. स्मार्ट फोन वापर आणि गेम डाऊनलोड करणे जसे सोपे तसेच फसवणूक करणाऱ्यांसाठी त्यांना लक्ष करणे तितकेच सोपे आहे. यु.एस. मध्ये ६७ टक्के प्रौढ आणि १८ वर्षाखालील ७६ टक्के मुले व्हिडिओ गेम खेळतात. ही एका देशातील संख्या आहे. भारतात ४४ कोटी २० लाख लोक खेळतात. दररोज साडे आठ तास ते गेम खेळतात. त्यामुळे ऑनलाईन गेमिंग फसवणूक प्रकार वाढले आहेत.

ऑनलाईन व्यवहार ही काळाची गरज तसेच श्रमाची, पैश्यांची बचत, असे असले तरी या व्यवहारात सावधगिरीही पण काळाचीच गरज असल्याचे म्हणणे वावगे ठरत नाही.

शेवटी 'ऑनलाईन'चे अनुभव कमी-जास्त प्रमाणात जवळपास सर्वांनाच आलेले आहेत. अनेकांनी स्वतःला दोष देत या प्रकाराकडे दुर्लक्ष केलेले आहे. तर ऑनलाईन फसविणाऱ्यांबद्दल एक शेर आठवतो...

**इक आईना कितनी शक्लें देखेगा**
**मक्कारी के कितने चेहरे निकलेंगे।**

## प्रासंगिक




प्रा. मधुकर चुटे

9420566404



# आरोग्य आणि धनाचे महत्त्व सांगणारी धनत्रयोदशी!

दीपावलीच्या प्रकाश पर्वाला सुरुवात झालेली आहे. धनत्रयोदशी ही खऱ्या अर्थाने शरीर, आरोग्य आणि मनाची सुदृढता जपण्याकरिताच साजरी होत असते. प्राचीन काळापासून धनत्रयोदशीचा हा सण प्रामुख्याने आरोग्यम् धनसंपदा या सूत्राशीच निगडित राहिला आहे. देवदानवांच्या युद्धाच्यावेळी समुद्रमंथनातून निर्माण झालेली ही धन्वंतरी देवता सर्व प्रकारचे अनिष्ट चिंतणारी आहे. शरीरमाद्यं खलु धर्म साधनम्. अशा प्रकारचे एक मोठे चिंतन हजारो वर्षांपूर्वी मांडले गेले. एवढेच नव्हे तर या शरीर आणि मनाच्या संवर्धनाची कार्यपद्धतीसुद्धा सांगितली गेली. भारतीय संस्कृतीने सृष्टीच्या पूजनाचा आणि शरीर आरोग्याचा संबंध दाखवला. सृष्टीचक्रानुसार आरोग्य चांगले ठेवण्यासाठीची व्यवस्थाही निर्माण केली गेली. याच धन्वंतरी देवतेला आराध्य मानून आयुर्वेदशास्त्रातसुद्धा शरीर आरोग्याची काळजी घेत असतात. त्यावरच्या उपाययोजना सांगत असतात. शरद ऋतूच्या काळात येणारा दिवाळी सण वातावरणात भरून येणारा विशिष्ट प्रकारचा बदल आणि या काळात सांगितली जाणारी आहार, विहार किंवा व्यायामाचेसुद्धा महत्त्व विशद केले गेले. याचा अर्थ आपल्याला मिळालेली शरीर बुद्धीची देणगी हेसुद्धा एक फार मोठे धन आहे. त्याचा योग्य तो वापर करून स्वतःबरोबरच समाजाचे आरोग्य व्यवस्थित ठेवता येऊ शकते.

शरद आणि हेमंत ऋतुकाळात शरीराविषयी घेतली गेलेली काळजी पुढे वर्षभर उपयोगात येते. वातावरणात शीतलता असते. अन्य ऋतूंपेक्षा या काळात हवादेखील शुद्ध असते. याच काळामध्ये विशिष्ट प्रकारचा आहार सांगितला गेला. शरीराबरोबर मनालादेखील प्रसन्न ठेवणारा पौष्टिक आहार आयुर्वेदाने सांगितलेला आहे.

सर्वसाधारणपणे पैसा, अडका, दागदागिने, जमीन यांना धन समजले जाते; परंतु प्राचीन काळामध्ये धन या शब्दाची अतिशय व्यापक व्याख्या केलेली पाहायला मिळते. आपल्याकडे असणारे पशुधन किंवा गोधन हे फार मोठ्या संपत्तीसारखे किंवा लक्ष्मीसारखे मानले जातात. याचे कारण असे होते की, हे पशुधन पिढ्यान्‌पिढ्या टिकून राहत असे आणि ते सतत साहाय्यभूत राहिल्यामुळे त्यांचा आधार वाटायचा. हे पशुधन टिकून राहावे किंवा ते अधिक वाढावे याकरिताच धनत्रयोदशीला त्याची पूजा करण्याचा प्रघात घडला. आज जरी प्रत्येकाला असे पशुधन बाळगणे शक्य नसले तरीदेखील शरीराच्या आणि मनाच्या संपन्नतेसाठी या सृष्टीतल्या सर्वांबद्दल कृतज्ञता बाळगायची. सृष्टीच्या नियमांचे पालन करून मनाची प्रसन्नता कायम ठेवणे आजच्या मनुष्यालादेखील सहज शक्य आहे. स्पर्धा, ताणतणाव किंवा केवळ पैसा असे उद्दिष्ट बाळगून धावत सुटणाऱ्या मनुष्याने मनुष्याने नेमके धन काय आणि त्यातून मिळणारे समाधान कसे आहे हे समजून घेण्याची आवश्यकता आहे.

दीपोत्सवातला हा सण आजच्या काळात साजरा करताना व्यापारी वर्ग काही प्रमाणात त्याच्याकडच्या पैशाअडक्याची पूजा करतात, पण सामान्य माणूसदेखील आपल्याकडे असलेल्या दागदागिन्यांची किंवा शेतकरी धनधान्यांची पूजा करून समृद्धीची कामना करतो. ही पूजाअर्चा म्हणजे जीवनाविषयीचा सकारात्मक दृष्टिकोन वाढीला लावायचा. नव्या आत्मविश्वासाने




अधिकाधिक संकल्प करून नवे ध्येय किंवा उद्दिष्ट साध्य करायचे, अशी प्रेरणा देण्याचे काम या सणाच्यानिमित्ताने होत असते. या सृष्टीमध्ये कोणतीही वस्तू टाकाऊ नाही. किंबहुना निसर्गातली प्रत्येक वस्तू मनुष्य जीवनाला पूरक आहे. आणि तिची उपयुक्तता ओळखून तिचा योग्य वापर करून घ्यायचा असतो. किंबहुना त्या वस्तूंचा आदर करून सन्मान करीत अधिक प्रसन्नता प्राप्त करून घ्यायची असाच उद्देश ठेवला गेला. ज्या धन्वंतरी देवतेने देवांनादेखील अमृताचे महत्त्व सांगितले. त्याच धन्वंतरीच्या देवतेच्या पूजनामधून शरीर आणि मनाच्या समृद्धीचा विचार सांगितला गेला आहे. भारतीय संस्कृतीने जपलेले हे सणाचे महत्त्व सृष्टीबरोबर आरोग्याचा विचार करणारे आहे.

## वाचक विचार मंच

# ई-कचऱ्याचा वाढता धोका!

सध्या पर्यावरण संवर्धनासाठी सर्व पातळीवर अनेक उपाययोजना आखल्या जात आहेत. मात्र, दिवसेंदिवस पर्यावरणाचे संतुलन बिघडण्यासाठी ई-कचरा मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरत आहे. पर्यावरण रक्षणासाठी आता ई-कचऱ्याची विल्हेवाट लावणे आवश्यक असून याबाबत जनजागृती होण्याची आवश्यकता आहे. सर्वच पातळींवर ई-कचऱ्याचा पुनर्वापर करणे आवश्यक असून कोल्हापुरात सहा हजार टन ई-कचरा निर्माण होत असून सोलापूर, सांगली, सातारा, कोकण, बेळगाव व गोवा या ठिकाणी एकही रिसायकल कंपनी नसल्यामुळे त्याची नीट विल्हेवाट लावली जात नाही. जिल्ह्यांमध्ये कचऱ्याची योग्य विल्हेवाट न लावल्यामुळे पर्यावरणासह आरोग्यालाही मोठा धोक्का निर्माण झाला आहे.

ई-कचऱ्यामधून ४८ प्रकारचे प्रदूषके बाहेर पडत आहेत. इलेक्ट्रॉनिक्स वस्तूंचे प्रमाण खूप वाढले आहे. इलेक्ट्रॉनिक उत्पादनांमध्ये मोठ्या प्रमाणावर स्पर्धा आल्याने कित्येक प्रकारच्या गोष्टी बाजारात येऊ लागल्या आहेत. बदलत्या ट्रेंडमुळे मोठ्या प्रमाणावर वस्तू उपलब्ध झाल्या आहेत. अनेक कंपन्यांचा खप होण्यासाठी ई-प्रोडक्ट तयार करतात, पण तीन ते चार वर्षात एखाद्या वस्तूचा पार्ट मिळणे बंद झाला की ती वस्तू टाकून देण्याशिवाय पर्याय नसतो. त्यामुळे ई-कचरा वाढला की पर्यावरणाला धोकाही वाढत आहे. प्रथम सर्व ई-कचरा गोळा केला जातो. त्यानंतर त्याची तपासणी केली जाते. सर्व पार्ट सुटे केल्यानंतर चांगल्या पार्टचे पुनर्वापर केला जातो. तर जे खराब पार्ट आहेत त्याची पावडर केली जाते. त्यानंतर त्यातील प्लॅस्टिक व मेटल पावड वेगवेगळी केली जाते. प्लॅस्टिक पावडर ही सिमेंट किंवा रस्ता बनविण्यासाठी या पावडरचा उपयोग होऊ शकतो. तर मेटल पुनर्वापर करण्यासाठी उपयुक्त ठरू शकते. ई- कचरा हा अलीकडे खूप प्रमाणात वाढत आहे. या कचऱ्याचे काय करावे याबाबत भारतात अद्यापही संशोधन झालेली नाही. या कचऱ्याचे विघटन होत नसल्यामुळे पर्यावरणावर याचा परिणाम होत असून यावर संशोधन होणे आवश्यक आहे. ई-कचरा कमीत कमी निर्माण होईल यादृष्टीने प्रयत्न गरजेचे आहेत.


**प्रा. सचिन बादल जाधव.**
पंढरपूर, मो.नं.-८४२५००३१२७


## धुमस

**भ्रमनिरास**

तिकींट वाटप होताच
नाराजी नाट्य रंगले
कित्येक इच्छुकांचे
जेव्हा स्वप्न भंगले

तेव्हा त्यांनी बंडखोरीसाठी
सज्ज केला आपला खांदा
प्रत्येक पक्षाला प्रश्न पडला
आता कसा मिटवावा हा वांधा?

निष्ठावंत ओरडू लागले
आम्ही गाळला आजवर घाम
मात्र आमच्यापेक्षाही
लाडके झाले आयाराम

ज्यांनी उचलल्या सतरंज्या
त्यांचा हक्क डावलल्या जावा
घरची म्हणते देवा! देवा!!
बाहेरचीला चोळी शिवा

काय करावे सूचत नाही
समस्या आहे गहन
सांगताही येत नाही
अन् होत नाही सहन

हाच अनुभव येत असेल
आम्हा निष्ठावंतांना वारंवार
तर नाक दाबून बुक्क्याचा
कुठवर सहन कारावा मार?

स्वार्थाचा उंदिर आजकाल
तत्व अन् निष्ठेला कुरतडतो
प्रामाणिक कार्यकर्त्यांचा
जीव खरंच तडफडतो

**ॲड. अनंत खेळकर**
अकोला


## संवाद

# 'कायदा सुव्यवस्थेच्या बाबतीत सर्वोत्कृष्टता गाठण्याची गरज'!

जगातील देशांमधील सरकारची ताकद, मूलभूत अधिकार, तपास व सुरक्षा व्यवस्था, नागरी-फौजदारी न्याय, भ्रष्टाचाराची स्थिती अशा घटकांचा विचार करून डब्ल्यूजेपी म्हणजेच वर्ल्ड जस्टिस प्रोजेक्ट हा निर्देशांक कायदा आणि सुव्यवस्था दर्शविणारी आकडेवारी प्रतिवर्षी जाहीर केली जाते. यंदा जाहीर करण्यात आलेल्या सदर निर्देशांकात जगातील १४२ देशांच्या क्रमवारीमध्ये भारताचे स्थान ९८ व्या क्रमांकांवर आहे. पाकिस्तान, माली आणि नायजेरिया हे देश शेवटच्या तीन स्थानांवर आहेत. लष्करी व्यवस्थेतील पाकिस्तानात कायदा सुव्यवस्था आणि लोकांचे अधिकार अत्यंत दयनीय अवस्थेत आहेत. फौजदारी न्याय, सरकारी भ्रष्टाचार, नियामक प्रवर्तन व्यवस्था, सार्वजनिक ठिकाणच्या वाद विवादांमुळे न्याय स्थिती कठीण तर कायदा सुव्यवस्था मोठ्या प्रमाणात बिघडल्याचे द्योतक असल्याचे या आकडेवारी दर्शविणाऱ्या अहवालात नमूद करण्यात आली आहे. जगातील सर्वोत्कृष्ट कायदा सुव्यवस्था असणाऱ्या देशांमध्ये लक्झेंबर्ग, सिंगापूर आणि डेन्मार्क यांचा प्रथम स्थानांवर समावेश आहे. भारताचे सर्वसमावेशक निर्देशांकात ७९ वे स्थान आहे जे पाकिस्तान व अन्य आशियाई देशांपेक्षा सरस आहे. अन्य आशियाई देशांपेक्षा भारताची लोकसंख्या प्रचंड आहे, त्या लोकसंख्येच्या सुरक्षेचा आणि कायदा सुव्यवस्थेशी मेळ घालणे तसे कठीणच आहे; परंतु सरकारांनी वर्तमान कायदे नियम आणि व्यवस्था यांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी अधिक मनुष्यबळ नेमून लोकांचे अधिकार, त्यांना न्याय मिळवून देण्याच्या प्रयत्नात तत्परता दाखविल्यास त्यावर लोकांचा विश्वास बसेल. लोकांचे जीवन, राहणीमान सुधारत जाईल. लोकं सुरक्षितपणे राहू शकतील. त्यासाठी येणाऱ्या प्रत्येक वर्षात वर्ल्ड जस्टिस प्रोजेक्ट या निर्देशांकातील आपल्या स्थानात सुधारणा होईल अशा लोकसेवा पार पाडाव्या लागतील. तेव्हाच भारत जगातील महासत्तेच्या प्रमुख दावेदारांप्रमाणे डब्ल्यूजेपी निर्देशकांतदेखील लक्षणीय प्रगती साधू शकेल, अशा कामांच्या तयारीची रणनीती आतापासून आखण्याची गरज आहे.


**राजन पांजरी**
मो.नं.९८१९७००८१८


## गुल्लेर




नरेंद्र इंगळे

9561226572


# व्हा सरके...

'काय करुन राह्यले तुम्ही?'

'चड्डी धून राह्यलो.'

'ते राहू द्या.. इकडे या आगुदर..'

'काय म्हनतं?'

'हे सज्ज्यावरचे डबे काढा. माहा हात पुरत नाही..'

'एवढा भांडोळा कायले काढला तुह्या?'

'दिवाईले घर चकचक दिसलं नाही पाह्यजे काय? लोकाईचे घरं पाहा कसे तकतक झयकून राह्यले.. बबलीच्या घराले पायरीपासून रंग देला.'

'आपूनबी देऊ पुढच्या वर्षी.. यंदा एकरी तीन किंटल सोयाबीन झालं.. त्याचं त्यालेच आटलं.'

'कालपासून बेदम होऊन राह्यली मी.. हातपाय ठनठन दुखतात.. त्याच्यात हे काट्टी काहीच हातभार लावत नाही.'

'सद्या लहान आहे ते.. चवथीतल्या पोरीले धंदा उरकते काय?'

'ते कपाट ओढा बाहीर.. सगळं सामायन हौदापाशी धुयाले नेऊन ठेवा.'

'मानसाले बेदम करून राह्यली तू.'

'मंग बाई सांगा एखांदी रोजानं.'

'बाया येत नाहीत यावात्की.. साऱ्याईच्या भोवती दिवाईची गळबळ हाय.'

'आजून लय धंदा राह्यला.. सकाऊन लवकर उठून शेव काढू लागजा मले.'

'तेही मलेच कऱ्याले लावतं काय?'

'मंग कोन करीन? साचा दाबूदाबू माहे हात दुखतात.. शेव झाले की चकल्या काढू लागजा.'

'चकल्या एकटी बाई काढू शकते.'

'एकटीच्या बोकांडीवर टाकता काय सारं? खाता कसे गुचूरगुचूर..'

'सकाय तू मले कानोले भराले लावशीन.'

'भरले म्हनून काय झालं? लय लोकं दरवाजे लाऊन कानोले करु लागतात.'

'नेलं सगळं सामान बाहीर.. जाऊ काय आता?'

'तिकडे जाऊन काय करता? मी भांडे धुतो.. तुम्ही घरात आना.. जसे होते तसे लाऊन द्या.'

'मी देवळात जाऊन येत होतो.'

'ते भांडे उचला आगुदर. देव कुठी पवून चालला नाही. रिकामे बहाने करु नका.'

'एवढं झालं की दुसरं काम सांगू नको मले.'

'त्या खिडक्या दरवाजे कोन पुसीन? फरशी पुसा लागते.. आंगन चकचक करा लागते.. एकटीचा जीव घेता काय? मोबाईल पाहाची घाई झाली काय तुमाले?'

'नाही बुवा..'

'मंग हे झालं की आंगनातला गयाठा सफा करा. दोनतीन दिवस सुटका नाही तुमाले.. चला व्हा सरके'.

# नीरा आर्या चित्रपटाचा वाद हायकोर्टात



वृत्तसंस्था

**मुंबई :** आझाद हिंद फौजेच्या सेनानी नीरा आर्याचा उत्तराधिकार, वारसा आणि चित्रपट निर्मितीचा लढा मुंबई उच्च न्यायालयात पोहोचला आहे. याप्रकरणी आगामी २४ नोव्हेंबर रोजी होणार आहे. दाक्षिणात्य अभिनेत्री रूपा अय्यर हिने वीरांगना नीरा आर्या हिच्या जीवनावर एक चित्रपट तयार केला आहे, जो रिलीजसाठी सज्ज आहे. तेजपाल सिंह धामा, मधु धामा आणि बंधू फिल्म्सने दोन वर्षांपूर्वी रुपा अय्यरच्या विरोधात कॉपी राईट कायद्यांतर्गत दिल्लीतील कडकडडुम्मा कोर्टात खटला दाखल केला होता. नीरा आर्या यांच्या जीवनावर आधारित रूपा अय्यर यांच्या चित्रपटाचे प्रदर्शन रोखण्यासाठी आता मुंबई उच्च न्यायालयात खटला दाखल करण्यात आला आहे.



**रतलाम :** इंदूरहून रतलामकडे येणाऱ्या डेमू पॅसेंजर ट्रेनला आग लागली. इंजिनमधून धूर येत असल्याचे पाहून लोको पायलटने ट्रेन थांबवली. ट्रेन अचानक थांबून धूर निघत असल्याचे पाहून प्रवाशांमध्ये घबराट पसरली. या घटनेची माहिती आजूबाजूच्या लोकांना कळताच त्यांनीही घटनास्थळी धाव घेत आग विझवण्यास सुरुवात केली. ज्या ठिकाणी ही घटना घडली ते ठिकाण रतलाम स्टेशनपासून ३० किमी अंतरावर आहे.

# इजिप्त व तुर्कीमधून १२० टन कांदा आयात

## कांद्याचे बाजारभाव नियंत्रणात येणार

देशोन्नती वृत्तसंकलन

**लासलगाव :** केंद्र सरकारकडून कांद्याचे बाजारभाव नियंत्रणात ठेवण्यासाठी परदेशातून कांदा आयात करण्यासाठी परवानगी दिल्याने अफगाणिस्तानपाठोपाठ आता इजिप्त व तुर्कीमधून १२० टन कांदा दाखल झाला आहे. सदरचा कांदा मुंबई, पुणेसह मेट्रो शहरात दाखल झाला आहे. या कांद्याच्या आयातीने ग्राहकांना कमी दरात कांदा मिळावा यासाठी केंद्र सरकारने केलेला प्रयत्न आहे.

नाफेड व एनसीसीएफच्या माध्यमातून सरकार कांदा बाजार भाव पाढण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे; परंतु सरकारने इजिप्त व तुर्की येथून मुंबई पुना या मेट्रो सिटीत कांदा आणून शेतकऱ्यांच्या कांद्याचे बाजार भाव पाडण्याचे काम करत असल्याचे कांदा व्यापारी प्रवीण कदम यांनी सांगितले.

# अली खामेनीयाचे हिब्रू भाषेतील अकाऊंट बंद

## नियमभंग केल्याने कारवाई

वृत्तसंस्था

**इराण :** इराणचे सर्वोच्च नेते अली खामेनी यांचे हिब्रू भाषेतील सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स (पूर्वीचे ट्विटर) अकाऊंट काही तासांतच निलंबित करण्यात आले आहे. त्यांनी नियमांचे उल्लंघन केल्याचा दावा करत एक्सने ही कारवाई केली आहे. दरम्यान, खामेनी यांचे एक्स अकाऊंट पूर्वीप्रमाणेच सुरू आहे. इस्रायलने शनिवारी इराणवर हवाई हल्ला केला. या हल्ल्यानंतर खामेनी यांनी शनिवारी रात्री उशिरा सोशल मीडिया प्लॅटफॉर्म (पूर्वीचे ट्विटर) हिब्रू भाषेत आपले खाते सुरू केले. काही तासांतच हे अकाऊंट स्थगित करण्यात आले आहे. इराणवर हल्ला करून ज्यू राजवटीने दोन रात्री मोठी चूक केली असून, आता, इस्रायलला इराणी लोकांचे सामर्थ्य, दृढनिश्चयाची शक्ती समजावून सांगावी लागेल.

# हरणाच्या बेंबीपासून तयार होणारे परफ्यूम

## बेंबीचा सर्वात आकर्षक सुगंध

वृत्तसंस्था

**मेक्सिको :** जंगलात एक कस्तुरी मृग राहतो, ज्याच्या



बेंबीचा सुगंध हा जगातील सर्वात आकर्षक असा सुगंध आहे, हे कविता आणि निबंधांमध्ये वाचत आलो आहोत. तर या सुगंधाची इच्छा इतकी प्रबळ आहे की तो सुगंध मिळविण्यासाठी मानवाने मोठ्या प्रमाणावर हरणांची शिकार केली आहे. अनेक लोक यावर विश्वास ठेवत नाहीत. याला केवळ एक गैरसमज मानतात, पण खास मृग (हरीण) कस्तुरी आणि त्यातून येणाऱ्या अप्रतिम सुगंधाविषयी काही वास्तविक तथ्ये लक्षवेधी आहेत.

# कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्यावर गुन्हा दाखल

वृत्तसंस्था

**म्हैसूर :** म्हैसूर अर्बन डेव्हलपमेंट अथॉरिटी (मुडा) चा समावेश असलेल्या मनी लॉन्ड्रिंग प्रकरणात अंमलबजावणी संचालनालयाने सोमवारी नवीन छापे टाकले. याप्रकरणी त्यांनी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. अधिकृत सूत्रांनी ही माहिती दिली. बेंगळुरू आणि म्हैसूरमधील सुमारे सात-आठ परिसरांची झडती घेतली जात आहे. फेडरल एजन्सीने १८ ऑक्टोबर रोजी म्हैसूरमधील मुडा कार्यालय आणि इतर काही ठिकाणी छापे टाकले होते.


गेल्या आठवड्यात बेंगळुरू प्रादेशिक कार्यालयात एमयूडीएच्या काही खालच्या स्तरावरील अधिकाऱ्यांचीही चौकशी केली होती.

# बहुतांश सर्वेक्षणात डोनाल्ड ट्रम्प यांची आघाडी

देशोन्नती वृत्तसंकलन

**वॉशिंग्टन :** अमेरिकेच्या अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी दोन आठवड्यांपेक्षा कमी कालावधी शिल्लक असताना, उपराष्ट्रपती कमला हॅरिस आणि माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे दोघेही लोकप्रिय मतांमध्ये ४८ टक्के बरोबरीत आहेत, न्यूयॉर्क टाइम्सने केलेल्या अंतिम राष्ट्रीय सर्वेक्षणानुसार, शर्यत अत्यंत चुरशीची दिसते आहे.

न्यूयॉर्क टाईम्सच्या मते, सर्वेक्षणाचे निकाल हॅरिस यांच्यासाठी उत्साहवर्धक नाहीत, कारण ते निवडणुकीच्या केवळ दोन आठवड्यांपूर्वी आले आहेत आणि संपूर्ण अमेरिकेतील लाखो लोकांनी आधीच मतदान केले आहे. अमेरिकेत ५ नोव्हेंबर रोजी निवडणुका होणार आहेत. माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा निवडणूक लढवत आहेत आणि



उपराष्ट्रपती कमला हॅरिस यांनी अमेरिकेच्या पहिल्या महिला राष्ट्राध्यक्ष बनून इतिहास रचण्याचे ध्येय ठेवले आहे. दरम्यान, सोशल मीडियावर डोनाल्ड ट्रम्प आणि कमला हॅरिस यांच्यात युद्ध सुरू आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर दोन्ही उमेदवार एकमेकांना लक्ष्य करत आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी इन्स्टाग्रामवर एक व्हिडिओ शेअर करत कमला हॅरिस यांना जो बायडेन म्हटले आहे.

# जगातील सर्वात मोठा तलाव पावतोय आकुंचन

वृत्तसंस्था...

**तेहरान :** जागतिक तापमानवाढ आणि हवामान बदलाचा विपरित परिणाम जगभरात अनुभवायला मिळत आहेत. यामुळे अनेक देशांना नैसर्गिक आपत्तींचा सामना करावा लागत आहे. तसेच जलस्रोतांवरदेखील या गोष्टींचा परिणाम पाहायला मिळत आहे. जगातील सर्वात मोठा तलाव या कारणांमुळे आकुंचन पावत असल्याने शास्त्रज्ञ चिंतेत आहेत.

कॅस्पियन सागर हा जगातील खाऱ्या पाण्याचा सर्वात मोठा तलाव मानला जातो. चार लाख चौरस मैल म्हणजेच दहा लाख चौरस किलोमीटर क्षेत्र असलेल्या या तलावाची जगभरात चर्चा आहे. या तलावाचा आकार हा

## शास्त्रज्ञ पडले चिंतेत



युरोपातील जर्मनी या देशापेक्षाही मोठा आहे. या तलावावर कझाकिस्तान, इराण, अझरबैजान, रशिया आणि तुर्कमेनिस्तान यासारखे देश अवलंबून आहेत. हा तलाव सतत आकुंचन पावत असल्याने भविष्यात खूप मोठ्या लोकसंख्येला धोका निर्माण होऊ शकतो. हवामान बदल, मानवी हस्तक्षेप आणि या सरोवराच्या महत्त्वाबाबत शास्त्रज्ञ खूप चिंतेत आहेत. तलावाच्या किनाऱ्यावर वसलेल्या मानवी वसाहती मासेमारी, शेती, पर्यटन, पिण्याच्या पाण्यासह इंधन आणि गॅस साठ्यासाठी यावर अवलंबून आहेत. तसेच कॅस्पियन सागर या भागातील कोरड्या हवामानावर नियंत्रण ठेवण्यास मदत करतो. त्यामुळे मध्य आशियात पाऊस पडतो आणि हवामान संतुलित राहते, पण या तलावाची घटत असलेली पाणीपातळी शास्त्रज्ञांसाठी चिंतेचा विषय ठरत आहे. एकीकडे हवामान बदलामुळे हिमखंड वितळत असल्याने जगभरातील सर्व समुद्रांमधील पाणीपातळी वाढत आहे. मात्र, दुसरीकडे लँड लॉक्ड समुद्र आणि तलावांना धोका निर्माण होत आहे.




# आग्र्यात बनावट औषधे बनवणाऱ्या सिंडीकेटचा पर्दाफाश

# टॉफी कँडीच्या नावाने बनावट औषध

वृत्तसंस्था

**आग्रा :** उत्तर प्रदेशातील आग्रा येथील एका कारखान्यात मोठ्या प्रमाणावर बनावट औषधे बनवणाऱ्या सिंडीकेटचा पर्दाफाश झाला या कारखान्यात तयार झालेली ८० कोटी रुपयांची बनावट औषधे बाजारात विकली जात असल्याचा प्रकार उघडकीस आल्याने खळबळ उडाली आहे. कारखान्यावर छापा टाकला असता घटनास्थळावरून ८ कोटी रुपयांची बनावट औषधे व २० लाख रुपयांची रोकडही जप्त करण्यात आली. टॉफी बनवण्याच्या नावाखाली हा कारखाना चालवला जात होता. विजय गोयल असे या कारखान्याच्या मालकाचे नाव आहे.

विजय गोयल याला बनावट औषधे बनवल्याप्रकरणी अटक करण्यात आली होती. ८ महिने तुरुंगात राहिल्यानंतर काही दिवसांपूर्वी तो जामिनावर बाहेर आला होता. आग्रा येथील कारखान्यात अँटी नार्कोटिक्स टास्क फोर्सच्या छाप्यात या बनावट औषध रॅकेटचा पर्दाफाश झाला.

## संशयास्पद हालचालींमुळे टास्क फोर्सचे लक्ष

विजय गोयल गेल्या ४ महिन्यांपासून सतत हिमाचल प्रदेशचा दौरा करत होता. त्याच्या संशयास्पद हालचालींमुळे टास्क फोर्सच्या अधिकाऱ्यांनी त्याचा पाठलाग केला. त्यानंतर बनावट औषधे बनवणाऱ्या कारखान्याचा खुलासा झाला. आग्रा येथील सिकंदरा पोलीस ठाण्यापासून ४ किलोमीटर अंतरावर असलेल्या इंडस्ट्रियल एरियातील मोहम्मदपूर परिसरात बनावट औषधे बनवण्याचा हा कारखाना छुप्या पद्धतीने चालवला जात होता. या कारखान्याच्या आसपास कोणत्याही प्रकारची लोकवस्ती नाही. तेथे ना घरे, ना दुकाने. रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत कारखान्यात काम सुरू असल्याची माहितीही समोर आली. दिवसभर कारखान्याला कुलूप असायचे.

# शेख हसिना यांच्याविरोधात गुन्हा दाखल

## न्यायालयाचे आदेश तपास अहवाल सादर करा

देशोन्नती वृत्तसंकलन

**बांगलादेश :** माजी पंतप्रधान शेख हसिना यांच्याविरोधात दाखल झालेल्या हत्येप्रकरणी शनिवारी ढाका येथील न्यायालयात सुनावणी झाली. बांगलादेशी वृत्तपत्र डेली स्टारच्या वृत्तानुसार, न्यायालयाने पोलिसांना सोमवार, २८ नोव्हेंबरपर्यंत तपास अहवाल सादर करण्यास सांगितले आहे. हे प्रकरण मीरपूरमधील १८ वर्षीय महाविद्यालयीन विद्यार्थ्याच्या सरकारविरोधी निदर्शनांदरम्यान झालेल्या मृत्यूशी संबंधित आहे.

या प्रकरणात हसिना आणि इतर २३ जणांना आरोपी करण्यात आले आहे. आंदोलनादरम्यान सुरक्षा दलांनी केलेल्या



कारवाईत विद्यार्थ्याचा मृत्यू झाला. १५ ऑगस्ट २०२४ रोजी मृताच्या भावाने हसिना आणि अन्य २३ आरोपींविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल केला होता. हसिना हिंसेत थेट सहभागी असल्याचा किंवा त्याला प्रोत्साहन दिल्याचा आरोप आहे, ज्यामुळे तक्रारदाराच्या भावाचा मृत्यू झाला. हसिना व्यतिरिक्त, त्यांच्या सरकारमध्ये माजी गृहमंत्री असदुझ्झमन खान, अवामी लीगचे सरचिटणीस ओबेदुल कादिर, माजी कायदा मंत्री अनिसुल हक आणि माजी पोलीस आयजी चौधरी अब्दुल्ला अल-मामून यांचाही समावेश आहे. हसिनांवर आतापर्यंत २२५ गुन्हे दाखल आहेत. यामध्ये १९४ खून, १६ हत्याकांड, ३ अपहरण, ११ खुनाचा प्रयत्न आणि १ विरोधी बीएनपी पक्षाच्या कार्यक्रमावर हल्ला यांचा समावेश आहे.

# बंगालमध्ये भाजपची सत्ता येणार

## मिथुन चक्रवर्ती यांनी वर्तवले भाकीत

वृत्तसंस्था

**कोलकता :** पश्चिम बंगालमध्ये २०२६ यावर्षी विधानसभा निवडणूक होईल. त्या निवडणुकीनंतर भाजपची सत्ता येईल, असे भाकीत ज्येष्ठ अभिनेते मिथुन चक्रवर्ती यांनी केले आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत बंगालमधील भाजपच्या सदस्य नोंदणी मोहिमेचा प्रारंभ झाला. त्या सोहळ्यात मिथुनदा बोलत होते. बंगालमध्ये भाजपच्या सत्तेचे लक्ष्य गाठण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करू, अशी ग्वाही त्यांनी दिली.

लोकसभा निवडणुकीवेळी मी ३७ दिवस भाजपचा प्रचार केला. मात्र, त्या निवडणुकीत भाजपचे संख्याबळ घटल्याची खंत वाटते, अशी भावनाही राज्यसभेचे माजी खासदार असणाऱ्या मिथुनदांनी व्यक्त केली. बंगालमध्ये मागील काही वर्षांत भाजपची राजकीय ताकद वाढली आहे.

# पनवेलकरांना चिकनगुनियाचा ताप

**पनवेल :** नवीन पनवेलसह पनवेल परिसरात चिकनगुनियाच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ झाली आहे. याबाबत आता पनवेल महापालिकेनेही आढावा घेऊन उपाययोजना करण्यास सुरुवात केली आहे. मात्र, रुग्णांमध्ये वाढ झाल्यामुळे दवाखान्यांमध्ये गर्दी होत आहे.



**मेक्सिको सिटी :** मेक्सिकोतील जकाटेकास या प्रांतात एका महामार्गावर बस दुर्घटनाग्रस्त झाल्याने १९ जणांना जीव गमवावा लागला आहे. तर ६ जण जखमी झाले आहेत. एक बस मक्याची वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर-ट्रेलरला मागून धडकल्याने ही दुर्घटना घडल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले आहे. ही टक्कर अत्यंत अधिक तीव्रतेची असल्याने दोन्ही वाहने दरीत कोसळली आहेत.

# पाकिस्तानने चीनकडे मागितले १.४ अब्ज डॉलर्सचे कर्ज


**इस्लामाबाद :** रोखीच्या संकटात अडकलेल्या पाकिस्तानने पुन्हा एकदा चीनकडे हात पुढे केले आहेत. आधीच कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या पाकिस्तानने आता चीनकडून १.४ अब्ज अमेरिकन डॉलर (१० अब्ज युआन) कर्ज मागितले आहे. तर पाकिस्तानचे चीनवर आधीच ४.३ अब्ज डॉलर (३० अब्ज युआन) कर्ज आहे.

# रेव्ह पार्टीत 21 मुले तर 14 मुली सापडल्या; आयोजक दक्षिणच्या दिग्गज नेत्याचा 'नातेवाईक'

देशोन्नती वृत्तसंकलन

**सायबराबाद :** तेलंगणातील सायबराबादमध्ये रेव्ह पार्टीचा पर्दाफाश झाला आहे. एका हायप्रोफाईल छाप्यात फार्महाऊसवर रेव्ह पार्टी करणाऱ्या ३५ जणांना ताब्यात घेण्यात आले आहे. या रेव्ह पार्टीचे कनेक्शन केटीआरच्या जवळच्या लोकांशी जोडले जात आहे. माहितीनुसार, तेलंगणाचे माजी मंत्री केटी रामाराव (खऊं) यांचे नातेवाईक मानल्या जाणाऱ्या राज पकाला यांच्या जनवाडा फार्महाऊसवर टाकलेल्या हाय-प्रोफाइल छाप्यात अवैध दारू आणि ड्रग्जचा वापर उघड झाला आहे. पार्टीत उपस्थित असलेल्या २१ पुरुष आणि १४ महिलांचा समावेश होता. ही कारवाई नरसिंगी पोलीस, स्पेशल ऑपरेशन टिम (एसओटी) आणि उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी संयुक्तपणे केली. मकिला पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या या फार्महाऊसमध्ये रेव्ह पार्टी सुरू असल्याची माहिती मिळाल्यावर छापा टाकण्यात आल्याचे सांगण्यात आले.

तपासादरम्यान १०.५ लिटर



विदेशी दारूच्या सात बाटल्या आणि परवाना नसलेल्या भारतीय दारूच्या दहा बाटल्याही जप्त करण्यात आल्या. हे राज्याच्या उत्पादन शुल्क कायद्याचे उल्लंघन आहे. संशयाच्या आधारे, अधिकाऱ्यांनी पार्टीत उपस्थित लोकांची ड्रग टेस्ट केली, ज्यामध्ये विजय मदुरी नावाच्या व्यक्तीला कोकेन पॉझिटिव्ह आढळून आले. मदुरीला पुढील चाचण्यांसाठी रुग्णालयात पाठवण्यात आले असून एनडीपीएस कायद्याच्या कलम २७ नुसार त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फार्महाऊस मालक राज पाकला यांच्या विरोधात कलम 34(A), ३४(१) आणि उत्पादन शुल्क कायद्याच्या कलम ९ अंतर्गत परवान्याशिवाय मद्य सेवा केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जागा न मिळाल्याने आठवले नाराज

## फडणवीसांना पत्र लिहून केली जागेची मागणी

**मुंबई :** विधानसभा निवडणुकीनंतर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची भेट होऊ शकते, असा दावा केंद्रीय मंत्री आणि रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी केला आहे. महायुतीच्या जागावाटपात मित्र पक्ष असलेल्या रिपाइं पक्षाच्या वाट्याला जागा न आल्याने रामदास आठवले नाराज झाले आहेत. त्यांनी आज पत्रकार परिषद घेऊन आपली नाराजी उघडपणे बोलून दाखवली. यासोबतच आठवले यांनी उद्धव ठाकरे यांना महायुतीसोबत येण्याची ऑफरही दिली आहे. रामदास आठवले म्हणाले की, मी आणि माझ्या पक्षातील अनेक कार्यकर्ते नाराज आहेत.

# समुद्रातील माशांमध्ये तब्बल ३५ टक्के घट

देशोन्नती वृत्तसंकलन

**पनवेल :** तुम्ही मत्स्यप्रेमी असाल तर ही बातमी तुमची चिंता वाढवणारी आहे. रायगड जिल्हा हा मासेमारीसाठी प्रसिद्ध आहे. इथल्या खाऱ्या माशांवर मत्स्यप्रेमी नेहमीच ताव मारतात. मात्र, १९९० च्या तुलनेत समुद्रातील माशांमध्ये तब्बल ३५ टक्के घट झाली आहे. ही बाब कोळी-मच्छीमारांसाठी नक्कीच चिंतेची आहे, कारण मासेमारीसाठी खर्च वाढला आहे तर जाळयात कमी मासे सापडत आहेत. त्यामुळे मासेमारी करून आर्थिक गणिते साधता येत नाहीत, हे काही वर्षांपासून मच्छीमारांची मुलांच्याही लक्षात आले आहे.

रायगडच्या खारेपट्ट्यात जिताड्याची भात कापणीच्या काळात खूप चर्चा असते. अगदी काही वर्षांपूर्वी टोपल्या-टोपल्या भरून भात कापणीच्या काळात शेतात जिताडे मिळायचे. आता याच जिताड्याचे दर्शनदेखील दुर्लभ झाल्याचे शेतकरी सांगतात, पण जलप्रदूषणामुळे जवळपास ४८ मत्स्य प्रजातींवर कुऱ्हाड कोसळली आहे.

## किनारपट्ट्या प्रदूषित झाल्याचा आरोप

समुद्रातील मासेमारी हा रायगड किनारपट्टीवरील मुख्य व्यवसाय मात्र, दरवर्षी मच्छीचे प्रमाण घटत आहे. मत्स्य उत्पादनाची घटती संख्या पाहता आणखी पाच वर्षांची कोणती चित्र असेल याचा नुसता विचार केलेलाच बरा. रायगड जिल्ह्यातील किनारपट्ट्या प्रदूषित झाल्याचा आरोप मच्छीमार करतात. अनेक कारखान्यांतून रसायने समुद्रात सोडले जातात.

## युवकांनी मत्स्यव्यवसायाकडे फिरवली पाठ



# गँगस्टर सुंदर भाटीची कारागृहातून सुटका

**लखनौ :** समाजवादी पक्षाचे नेते हरेंद्र प्रधान आणि त्यांचा सरकारी गनर भुदेव शर्मा यांच्या हत्येप्रकरणी जन्मठेपेची शिक्षा भोगत असलेल्या पश्चिम उत्तर प्रदेशातील कुख्यात गुंड सुंदर भाटी याला उच्च न्यायालयाकडून जामीन मिळाला आहे. जामीन मिळाल्यानंतर सोनभद्र तुरुंगात बंदिस्त असलेल्या सुंदर भाटी यांची गुपचूप सुटका करण्यात आली.

# भावी नसून फिक्स आमदार होतील!

## चर्चेतले | डॉ.योगेश क्षीरसागरांसाठी मुंडे बहिण-भावाची प्रतिष्ठा पणाला!

बीड/पुण्यभूमी प्रतिनिधी

महायुतीतील बीडच्या जागेचा तिढा अखेरच्या क्षणापर्यंत सुटत नव्हता. जागावाटपात शिवसेनेच्या वाट्याला गेलेली बीडची जागा मुंडे बहीण-भावाने प्रतिष्ठापणाला परत खेचून आणली. मंगळवारी (दि.२९) मध्यरात्री १ वाजता हा तिढा सुटला आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांना बीड विधानसभेचा सदस्य अर्थात आमदार होण्याची संधीच प्राप्त झाली आहे.

महायुतीचे अधिकृत उमेदवार ठरलेल्या डॉ.योगेश क्षीरसागर यांनी महायुतीच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केला. उमेदवारी अर्ज दाखल करताना भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, शहराध्यक्ष जगदीश गुरखुदे, रिपाइं कवाडे गटाचे जिल्हाध्यक्ष अनिल तुरुकमारे, अजय सवई, डॉ.लक्ष्मण जाधव, ड.प्रज्ञाताई खोसरे, राष्ट्रवादी युवक शहराध्यक्ष सचिन जाधव, इरफान बागवान, अनिल चांदणे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा, तालुकास्तरीय पदाधिकारी, आजी-माजी जि.प.सदस्य, पं.स.सदस्य, सरपंच, नगरसेवक यांच्यासह कार्यकर्ते उपस्थितीत होते. भाजपचे जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख म्हणाले, डॉ.योगेश क्षीरसागर हे भावी नसून फिक्स आमदार आहेत. लोकसभा निवडणुकीमध्ये आ.पंकजाताई मुंडे यांचे प्रामाणिकपणे काम केल्याचे त्यांना फळ मिळेल, असे मत व्यक्त केले. तसेच, पंकजाताईंसह उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, ना.धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली डॉ.योगेश क्षीरसागर यांना गुलाल लावल्याशिवाय राहणार नाही, असा निर्धार राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला. तसेच, मित्र पक्षाच्या जिल्हाध्यक्ष, पदाधिकाऱ्यांनी विजयासाठी शुभेच्छा देऊन ताकदीने महायुतीला सत्तेत आणू, असा विश्वास व्यक्त केला. यावेळी कार्यकर्त्यांची मोठी गर्दी होती.



### सर्वांना सोबत घेऊन निवडणूक लढविणार:डॉ.योगेश क्षीरसागर

डॉ.योगेश क्षीरसागर यांनी विकासाच्या मुद्द्यावर निवडणुकीला सामोरे जाणार आहे. मी आजपर्यंत केलेल्या कामाची पावती मला जनता देईल. महायुतीमधील सर्व मित्र पक्षाचे पदाधिकारी, सहकाऱ्यांना सोबत घेऊन काम करू, असे मत डॉ.योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केले.

# रोजगार प्रमाणपत्र वाटपातून संधी!

## नियोजन: राह,सेवा फाऊंडेशनचा संयुक्त उपक्रम



नगर/पुण्यभूमी प्रतिनिधी

एंजल वन यांच्या सी एस आर फंडाचा आर्थिक साहाय्याने राह फाउंडेशन व सेवा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने अहिल्यानगर मध्ये मध्ये समर्थ प्रकल्प राबविन्यात येत आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून दोनशेहून अधिक युवक-युवतींना प्रशिक्षण देवून रोजगरची संधी उपलब्ध करून देत आहोत. दिनांक: २३ ऑक्टोबर २०२४ रोजी बॅच नं. ०७ च्या प्रमाणपत्र वाटपाचा कार्यक्रम पार पडला त्यामध्ये ३३ युवक-युवतींना प्रमाण पत्र देण्यात आले

प्रमाण पत्र वाटपा साठी प्रमुख पाहुणे म्हणून दिलावर सय्यद(बार्टी-वरिष्ठ संशोधन अधिकारी), सागर मोरे (राह फाऊंडेशन), कैवल्य देशमुख, रियाज मुलानी श्रुतिका शिरसाठ, पूजा कुरणे आदी उपस्थित होते. ३५ दिवसाच्या कौशल्य प्रशिक्षण. मॉड्यूल द्वारे युवक-युवतींना सक्षम करून त्यांना रोजगारची संधी उपलब्ध करून दिली जाते या प्रशिक्षणा मध्ये १० वी, १२ वी, पदवीधर, उच्च पदवीधर १८ ते २५ वयोगटातील युवक-युवती प्रशिक्षण घेऊ शकतात. अधिक माहिती साठी संपर्क. साई पॅलेस, दुसरा मजला, आकाशवाणी केंद्र समोर, प्रोफेसर चौक, सावेडी, अहमदनगर. मो.नं. ८३२९०३०४३० / ९३०७६७०८२६. या नंबर वरती संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले आहे

# बाजारपेठेत ग्राहकांची मोठी गर्दी!

## सनऊत्सव:लक्ष्मीपूजनाच्या साहित्याने बाजारपेठ सजली

कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

दीपावलीची खरेदी करण्यासाठी बाजारात गर्दी झाली असून, दिवाळीचा पहिलाच दिवस अन् वसुबारसमुळे खरेदीसाठी बाहेर पडलेल्या गृहिणींसह नागरिकांमुळे बाजारपेठ फुलून गेली. तर लक्ष्मीपूजनाच्या साहित्याने देखील बाजारपेठ सजली आहे.

आष्टीसह कडा, धामणगाव, धानोरा येथील बाजारपेठेत दीपावली सणानिमित्त विविध साहित्याने फुलून गेल्या असून नागरीकांसह गृहिणींनी खरेदी करण्यासाठी बाजारात गर्दी केल्याचे चित्र पहिल्याच दिवशी पाहायला मिळाली. कपड्यांसह आकाशकंदील, रांगोळी, फटाके, पणत्यांसह सजावटीच्या वस्तूंना विशेष मागणी होत आहे. यंदाच्या वर्षी सर्वच वस्तूंना महागाईची किनार असली, तरी ग्राहक हात आखडता का होईना, वस्तूंची खरेदी करीत होते. विशेष म्हणजे, किराणा दुकानातील जीवनावश्यक साहित्य महाग झाल्याने सर्वसामान्य कुटूंबियांचे बजेट कोलमडले असून, गृहिणींचा बाजारातील तयार फराळ घेण्याकडे कल दिसून येत आहे. तर सराफ दुकानेही सजली आहे. दुचाकी वाहनांचे बुकिंग जोरात सुरू आहे. या गर्दीमुळे आष्टी, कडा शहरातील बाजारपेठेत वाहतुकीची कोंडी होऊ लागली आहे.



# प्रेषितांच्या जीवनावर आधारित प्रश्न मंजुषा!

## कौतुकास्पद:उखाब रेलिफ फाऊंडेशनकडून उपक्रम

तलवाडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

उखाब रेलिफ फाऊंडेशन बीड च्या वतीने प्रेषित महमद साहेब यांच्या जयंतीनिमित्त प्रेषितांच्या जीवनावर आधारित प्रश्न मंजुषा कार्यक्रमाचे आयोजन केले होते.या मध्ये सतरा वेगवेगळ्या शाळेचे एकुण १६०० विद्यार्थीनी आपला सहभाग नोंदवला.सात वेगवेगळ्या परिक्षा केंद्रावर परिक्षा आयोजित करण्यात आली होती, ज्यात शंभर स्वयंसेवकांनी मदत केली.बक्षीस वितरणाच्या या कार्यक्रमाची सुरुवात पवित्र धर्मग्रन्थ कुराण मजितच्या पठनाने करण्यात आली.घेतलेल्या परिक्षेचा निकाल व बक्षीस वितरण समारंभ २७ऑक्टोबर २०२४ रविवार रोजी सकाळी दहा वाजता मिल्लीया सांस्कृतिक सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महमद अली बागे तर प्रमुख पाहुणे म्हणून इंजि. राहुल बोरा,मिल्लीया महाविद्यालय चे प्राचार्या डॉ. इलियास फाजील ,इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. अब्दुल अनिस , मिल्लीया माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय चे प्राचार्या डॉ. इरफान सिद्दीकी,जमात ईसल हिंद चे बीड जिल्हा अध्यक्ष प्राध्यापक जावेद अली खान, अडोकेट असिमा पटेल, हिना सिद्दिकी,मुफ्ती मोहयोददिन खान, मुफ्ती तालेब साहेब, मिरजा अझमतुलला बेग, उपस्थित होते. प्रमुख पाहुणे डॉ अब्दुल अनिस यांनी शिक्षणाचे महत्व व समाजाला अपेक्षित माणूस,या विषयावर व्याख्यान दिले.हिना कौसर यांनी मोबाईल फोनच्या दुरुपयोगापासुन दुर राहण्याचा सल्ला दिला. ऍडव्होकेट असिमा पटेल यांनी मुलींना विधी क्षेत्रात येण्याचे आवाहन केले व सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक पान २ वर...



# कार्याची दखल घेऊन सोपविले पद!

## अभिनंदनिय: आपच्या तालुकाध्यक्षपदी सुहास चौधरी



कडा/पुण्यभूमी प्रतिनिधी

आष्टी तालुका आम आदमी पार्टीच्या तालुकाध्यक्षपदी येथील सुहास चौधरी यांची जिल्हाध्यक्ष अशोक येडे यांच्या उपस्थितीत सर्वानुमते निवड झाली आहे.

आम आदमी पार्टीच्या बीड येथील पक्ष कार्यालयात आपचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे यांच्या मार्गदर्शनाखाली प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक झाली. या बैठकीत आम आदमी पार्टीच्या आष्टी येथील तालुकाध्यक्ष या पदावर कडा येथील सुपरिचीत व्यक्तिमत्व असलेले सुहास चौधरी यांना अशोक येडे यांनी नियुक्तिपत्र प्रदान करुन त्यांची तालुकाध्यक्ष म्हणून निवड जाहिर केली. या निवडीबद्दल प्रा. राम बोडखे, स्वप्निल पोटे, दत्ता सुरवसे, संतोष चौधरी, अब्दुल शेख, सुरेश जाधव, रफीक पठाण, राम शेंडगे आदींनी सुहास चौधरी यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

# रतन टाटा युवारत्न पुरस्कार!

## अभिनंदनिय: सरपंच अशोक खरात सन्मानित

गेवराई/पुण्यभूमी प्रतिनिधी

इको फ्रेंडली तरुण तगडा भारत आयोजित मुंबई मंत्रालय येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे दिनांक २७ ऑक्टोंबर रोजी उद्योजक डॉक्टर अशोक एन.जे.यांच्या हस्ते ठाकर आडगाव येथील माजी आदर्श सरपंच अशोक खरात यांना नुकताच रतन टाटा युवा रत्न आदर्श पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.हा पुरस्कार माजी सरपंच अशोक खरात यांनी पर्यावरण पूरक उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल यांना सन्मानित करण्यात आले अशोक खरात यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये ग्रामपंचायत स्तरावर अनेक विविध विकास कामे केली आहेत व त्यांनी मराठवाड्यात सर्वात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल त्यांना अनेक पुरस्कार देखील मिळाली आहे जसे की मराठवाड्यातील पहिली स्वच्छ व सुंदर हागणदारी मुक्त गाव म्हणून प्रथम पुरस्कार व वीस लाख रुपये बक्षीस स्वरूपात मिळाला. त्यानंतर पर्यावरण पूरक धुर मुक्त म्हणून जिल्ह्यात पहिला क्रमांक मिळाला व्यसनमुक्त म्हणून महाराष्ट्रातला दुसरा क्रमांक मिळाला अशोक खरात यांनी त्यांच्या कार्यकाळात पर्यावरण पूरक उत्कृष्ट कामगिरी केली ती म्हणजे शासनाच्या धोरणानुसार झाडे लावा झाडे जगवा अशी योजना होती परंतु अशोक खरात यांनी त्या गोष्टीला फाटा देत झाडे तोडू नये अशोक खरात यांच्या म्हणण्याप्रमाणे झाडे लावायची आवश्यकताच पडत नाही कारण पूर्वीच्या काळात कोणीच झाडे लावत नव्हते

झाडे हे निसर्गनिर्मित ऑटोमॅटिक उगवतात जन्म घेतात परंतु त्यांना नष्ट करू नका हा संदेश त्यांनी दिला पान २ वर...




# काँग्रेस कमिटीच्या प्रभारी अध्यक्षपदी राहुल सोनवणे



केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज येथील राहुल भैय्या सोनवणे यांची बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या प्रभारी जिल्हा अध्यक्ष पदी काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष राहुल सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मागच्या दोन दिवसापूर्वीच जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेसाहेब देशमुख यांनी प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांचेकडे आपला राजीनामा दिला होता त्या अनुषंगाने दि.२७ रोजी बीड जिल्हा काँग्रेस कमिटीच्या प्रभारी जिल्हा अध्यक्ष पदावर उपाध्यक्ष राहुल सोनवणे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. राहुल सोनवणे हे विद्यार्थी दशेपासून काँग्रेस मद्ये काम करत आहेत एन एस यु आय चे प्रदेश सरचिटणीस या सह जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्ष पदावर देखील त्यांनी काम पाहिले आहे. उच्च शिक्षित, संयमी व सुस्कृत राजकारणी म्हणून त्यांची जिल्ह्यात ओळख आहे. त्यांच्या या निवडीबद्दल काँग्रेसच्या नेत्या खा.सौ. रजनीताई पाटील, माजी मंत्री अशोक पाटील, आदित्य पाटील यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## धनंजय मुंडे | परळीत संयुक्त पत्रकार परिषद

# कोणतेही मतभेद किंवा मनभेद नव्हते

अंबाजोगाई/ पुण्यभूमी प्रतिनिधी माजी आ.संजय भाऊ दौंड यांनी महायुतीचे उमेदवार धनंजय मुंडे यांच्या पाठीशी सर्व ताकदीने उभे राहण्याचा निर्णय घेतला असुन, ते आजपासूनच धनंजय मुंडे यांच्या प्रचारात सक्रिय होणार असल्याचे आज धनंजय मुंडे व माजी आ.संजय भाऊ दौंड यांनी आज संयुक्त पत्रकार परिषदेत सांगितले आहे.माजी आ.संजय भाऊ दौंड हे विधानसभा निवडणुकीत इच्छुक असून, ते धनंजय मुंडे यांच्या विरोधात निवडणूक लढवतील का, या चर्चेला आता पूर्णविराम लागला आहे.

२०१४ व २०१९ या दोनही विधानसभा निवडणुकीत आम्ही दोघे सोबत होतो. एकदिलाने आम्ही एकत्र काम केले. २०१९ च्या निवडणुकीत मी विजयी झालो, त्यात संजय भाऊंचे मोलाचे सहकार्य लाभले. त्यांनंतर संजय भाऊंना पण विधानपरिषद सदस्यत्वाची संधी मिळाली. आता पुन्हा मी विधानसभा निवडणुकीत सामोरा जात आहे, तेव्हा संजय भाऊ हे पूर्ण ताकदीने माझ्या सोबत आहेत, याचा मला मनापासून आनंद आहे, असे धनंजय मुंडे यांनी यावेळी बोलताना म्हटले आहे. आगामी काळात पक्ष संजय भाऊंना आणखी उत्तम संधी मिळवुन देईल, असा विश्वासही धनंजय मुंडे यांनी व्यक्त केला. धनंजय मुंडे हे माझे बंधू आहेत. मागच्या आठवड्यात मी माझ्या सहकाऱ्यांशी चर्चा केली आणि आज धनंजय मुंडे यांच्या पाठीशी उभा राहण्याचा निर्णय मी जाहिर करत आहे. धनंजय मुंडे यांची ही निवडणूक ही माझी निवडणूक आहे, असे समजून मी पूर्ण क्षमतेने प्रचाराच्या मैदानात उतरणार असल्याचे माजी आ.संजय दौंड यांनी यावेळी बोलताना सांगितले. मुंडे-दौंड कुटुंबातील स्नेह कधीच कमी होणार नाही, आम्ही कायम एकदिलाने काम करत राहू, असेही धनंजय मुंडे पान २ वर...



# यंदा नमिताचा पराभाव निश्चित?

## चर्चा: केज मतदार संघ ओरबाडून खाल्ला

केज/पुण्यभूमी प्रतिनिधी

केज अंबाजोगाई संत्ताधारी आमदार पाच वर्षांपूर्वी विधानसभा निवडणुकीत मतदारांच्या घरोघरी मतांचा जोगवा मागून दलित, मुस्लीम मराठा समाजाला विकासाची गंगा तुमच्या दारात आणू असे आश्वासन देऊन मतांची पगडी भरून घेतली. आज पूर्ण पाच वर्षे झाले तरी दलित, मुस्लीम, मराठा समाजाचा विकास करण्यात आ. मुंदडा अपयशी ठरल्या. केवळ गुत्तेदार पोसण्याचे काम गेल्या पाच वर्षात झाले आहे. अंबाजोगाईहून कारभार करणाऱ्या आमदारांना दलित, मुस्लीम, मराठा समाजाला विकासापासून वंचित ठेवण्याचे घोर पाप केले आहे. त्यामुळे आता तिन्ही समाजाने एकीची मोठ बांधली असून येत्या २३ नोव्हेंबरला हाच मतदार धोबीपछाड करणार असल्याचे बोलले जात आहे. ज्या ऊसतोड मजुरांच्या मतांवर डोळा ठेवून आ.नमिताताई मुंदडा राजकारण करत आहेत त्या ऊसतोड मजुराच्या विकासाचा दिवा कोठे लावला आहे हे जाहीरपणे उत्तर देण्याची हिमत आ. नमिताताई मुंदडा करतील का? असा प्रश्न केज मतदारसंघातून उपस्थित होत आहे. के ज मतदारसंघात स्व. विमलताई मुंदडांनी विकासाची गंगा आणली होती. पण मतदारांचा आणि स्व. विमलताई मुंदडांचे जे नात होत ते नात जिल्ह्यातील कोणताही मतदार विसरू शकत नाही. मात्र हे नात टिकविण्यात आ. नमिताताई मुंदडा सपशेल अपयशी ठरल्या आहेत. पाच वर्षात अंबाजोगाईहून कारभार करणाऱ्या आ. मुंदडांना दलित, मुस्लीम समाजाच्या विकासासाठी पाच वर्षात काय दिवा लावला आणि कोठे विझला ते दिसून येत आहे. अशा परिस्थितीत आमदारांचे पती आणि सासरे यांनी केज पान २ वर...

